
ISSN 2278-9243

# कविता-रती

जानेवारी-फेब्रुवारी व मार्च-एप्रिल २०२३
वर्ष ३८ वे : अंक २ व ३



कवी आणि संपादक पुरुषोत्तम पाटील यांच्या स्मरणार्थ
काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा व कविविमर्श यांना वाहिलेले द्वैमासिक

# कविता-रती

संस्थापक संपादक : पुरुषोत्तम पाटील   संपादक : आशुतोष रमेश पाटील

जानेवारी-फेब्रुवारी व मार्च-एप्रिल २०२३ ❑ वर्ष ३८ वे : अंक २ व ३

**कविता**

प्रेषित सिद्धभट्टी यांच्या कविता २-४.

**परीक्षणे**

- 'निरंतर' (सतीश काळसेकर) : सबंध समष्टीप्रती कनवाळूपणा व्यक्त करणाऱ्या कविता - विकास पालवे ५-१६.
- 'आता वह्या सगळ्या बुडीत खाती' (अनुराधा पाटील) : दूषित राजकीय-सामाजिक पर्यावरणाचा प्रखर पट - सुजाता शेणई १७-२३.

**लेख**

अरुणा ढेरे यांच्या कवितांतील काव्यसौंदर्य (समाप्त) - अरुण ठोके २४-५४.

**कविता**

देविदास सौदागर यांच्या कविता ५५-५६.

आशिष वरघणे यांच्या कविता - ५६-५७.

**प्रतिसाद**

- 'पाऊसपर्ण' (जितेंद्र कुवर) : स्वसंवेद्य सौंदर्याची आत्मप्रतीती देणारी कविता - प्रकाश सपकाळे ५८-६५.
- आनंदाची 'खेळीमेळी' (लीला शिंदे) - शशिकान्त लोखंडे ६६-६९.

**कविता**

बाळकृष्ण सोनवणे यांच्या कविता - ७०-७३, अशोक इंगळे, नरेंद्र खैरनार ७३.

**टिपणे**

- श्री. पु. भागवत आणि कविता - माधव बोरकर ७४-७६.
- अखेर त्या कवितेचा उलगडा झाला ! - लक्ष्मण ढवळू टोपले ७७-८०.

मुखपृष्ठ - प्रमोदकुमार अणेराव

प्रकाशक-व्यवस्थापन-अक्षरजुळवणी - प्रकाश पुरुषोत्तम पाटील

कार्यालयीन साहाय्य व मुद्रितशोधन - पंकज माळी

# अरुणा ढेरे यांच्या कवितांतील काव्यसौंदर्य

अरुण ठोके

**(क्रमश :)**

**४. पारंपरिक स्त्रीभानः**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून स्त्रीच्या विविध रूपांचे चित्रण करण्यात येते. लहान बालिका, कुमारिका, तरुणी, प्रौढ स्त्री, मुलगी व आई अशा विविध रूपांतील स्त्रीचे दर्शन त्यांच्या कवितेत घडते. त्यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमांचे वेगळेपण शोधून पाहिल्यास त्यामागे पारंपरिक स्त्रीभान असल्याचे लक्षात येते. ढेरेंच्या कवितांतील स्त्रीमनाची जडणघडण भारतीय पर्यावरणातील संस्कारांच्या खुणा अंगोपांगी वागविणारी आहे. कौटुंबिक वातावरणात मिळालेले प्रेम, परस्परांविषयीचा आदरभाव, नात्यांचे महत्त्व, सांस्कृतिक संचितांचा ठेवा असलेले खाद्यपदार्थ, वेशभूषा, सणवार, चाली-रीती आदींचा खोलवर ठसा संवेदनक्षम काव्यव्यक्तिमत्त्वावर उमटलेला आहे. पारंपरिक मुशीतून, जीवनधारांतून तावून सुलाखून निघालेल्या सश्रध्द स्त्रीमनाचे दर्शन प्रतिमा-प्रतीकांच्या योजनेतून घडते. स्त्रीदुःखाकरिता इतरांना जबाबदार धरण्याऐवजी आत्मसंवादातून आत्मपरीक्षण करण्यात येते. आपल्या दुःखाप्रमाणे आई-आजीचे दुःख होते. त्यातून त्यांनी काढलेला मार्ग काही बोध देवू शकतो का? एकाकीपणाचे, उदासीनतेचे चित्रण, आई-मुलीचे हृदय नाते, स्त्रीस्वातंत्र्याची जाणीव, स्त्रीजीवनाविषयीची सार्वत्रिक निरीक्षणे, परंपरेतील राधा, उर्मिला, सीता, जनाबाई आदी दुःख भोगलेल्या स्त्रियांच्या दुःखाशी तादात्मीकरण करून घेण्याच्या वृत्तीतून संयमित, समंजस व आत्मनिर्भर स्त्रीभानाचे दर्शन घडते.

ढेरेंच्या कवितेतील तरुण मुलीचे वर्णन पाहिले तर त्यातून तरुणीची नाजूक, सकवार प्रतिमा डोळ्यापुढे उभी राहते. 'ही दवांच्या डोळ्यांची' या कवितेत मुलीचे वर्णन करताना योजलेल्या प्रतिमा उपमेयातून स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन स्पष्ट होतो. उदाहरणार्थ, 'ही दवांच्या डोळ्यांची, खारीच्या पायांची, मधाच्या पोळ्यासारखी पोर जमिनीखाली बी, तशी भवताल पांघरून झोपली आहे निरागस, बिनघोर' (जावे जन्माकडे, पृ.८२) मुलीच्या डोळ्यांचे वर्णन करताना 'दवांच्या डोळ्यांची' ही प्रतिमा योजण्यात आलेली आहे. यातून दवबिंदू हे आल्हाददायी हिवाळ्याचे आगमन घेवून येणाऱ्या सुखाचे प्रतीक म्हणून येतात. दंव हे पहाटेच्या वेळी पडणारे, गवत, वेली, झाडांना देखणे करणारे, वातावरणात गारवा पेरण्यासाठी पूरक ठरणारे असते. तसे मुलीचे डोळे म्हणजे तिच्या नजरेतून शीतलता प्रकट होतेय, हे तिच्या डोळ्यांत पाहणाऱ्याला पाहताक्षणीच जाणवेल.

म्हणजेच जिचे डोळे सुखानुभूती देतात अशी दंवाच्या डोळ्यांची ही मुलगी, हा एक अर्थ झाला. त्यातून स्त्रीकडे पाहण्याचा सौंदर्यविषयक पारंपरिक दृष्टिकोन व्यक्त होतो. आता दुसऱ्या अर्थाने आपण पाहिले तर दंव हे तात्कालिक असते त्याचे तृण, वेली-झाडासारखे स्वतंत्र अस्तित्व नसते. अस्तित्व असते ते परावलंबी व हिवाळ्याच्या पहाटेशी त्याचे नाते असते. उन्हे पडताच ते उडून जाते. त्याची सुखद अनुभूती ही तात्कालिक सुख देणारी असते. या अर्थाने या मुलीचे दंवाचे डोळे म्हणजे ही नजर, दृष्टी तात्कालिक सुखदायी आहे. तिचा स्वभाव, वागणे काही माहित नाही. हे सुख प्रत्यक्ष वावरताना एका झटक्यात दूर होईल, ही जाणीवही यातून सूचित होते. 'खारीच्या पायांची' या उपमेयातून तिची चपळता, चंचल वृत्ती सूचित होते. आणि 'मधाच्या पोळ्यासारखी पोर' या उपमेयातून तिचे लुसलुशीत कोवळे देहरूप सूचित होते. जमिनीखालच्या 'बी' समवेतही तिची तुलना करण्यात आलेली आहे. ज्याप्रमाणे बी जमिनीखाली स्वतःला गाडून घेवून सर्जन करते तशी स्त्री समाजात आपल्या इच्छा-आकांक्षांचे दमन करून घेऊन कुटुंबाची, समाजाची पर्यायाने संस्कृतीची उभारणी, वहन करीत असते. स्त्रीचे हे आत्मबलिदान, तिची समर्पणवृत्ती 'बी'प्रमाणे असते. हा मूल्यभाव पारंपरिक स्त्रीभानाचे निदर्शक म्हणून प्रस्तुत कवितेतून प्रकट होतो.

'दृष्ट उतरीन' या कवितेत आपल्या प्रिय व्यक्तीच्या आठवणींनी व्याकूळ झालेल्या स्त्रीमनाचे विलोभनीय चित्रण करण्यात आलेले आहे. कवितेतील 'मी' तिच्या प्रिय व्यक्तीची भेट घेण्यासाठी जेव्हा कधी जाईल त्यावेळी ती करणार असल्याच्या कृतीचे वर्णन करते. जेव्हा समोर भेटेल तेव्हा येताना मीठमोहऱ्या घेवून येईल असे ती म्हणते. मीठमोहऱ्या प्रिय व्यक्तीला आत्मवैभवी दुःखाची लागलेली दृष्ट उतरविण्यासाठी ती नेणार असते. प्रस्तुत वर्णनातून परंपरागत स्त्रीमनावर गाजविणाऱ्या सामाजिक रूढीचे दर्शन घडते. खेड्यातील रूढीचा भाग म्हणून घरातील जेष्ठ स्त्री कुटुंबासाठी कोणाही व्यक्तीची दृष्ट उतरवत असते. दृष्ट कोवळ्या जीवाला, लहान बालकांना किंवा देखण्या व्यक्तीला लागते, अशी सामाजिक समजूत असे. घरातील कोणाही आजी-आईला आपले मूल, मुलगी, सून देखणी वाटणे स्वाभाविक होय. त्यासाठी आपल्या अशा प्रियजनांची थोडीशीही तब्बेत ठीक वाटली नाही तर दृष्ट उतरविण्याची पध्दत होती. त्यातून दुःखनिवारण होत असल्याची मानसिकता रूढीने तयार झालेली आहे. पण एक रूढी म्हणून तिचा ठसा भारतीय समाजाच्या सामूहिक अबोधावर खोलवर उमटलेला आहे. आपल्या जवळच्या व्यक्तीप्रती प्रेम व्यक्त करण्याची ही एक पध्दत होती. या कृतीमुळे त्या व्यक्तीवरील संकट निवारण होते अशी धारणा आहे यातून परस्परांविषयीची आत्मीयता हा महत्त्वपूर्ण भाव सूचित होतो. हीच विशेष बाब 'आत्मवैभवी दुःखाची दृष्ट उतरविणे' या नव्या प्रतिमेतून सूचित होते. यातून कवयित्रीला लाभलेल्या सामूहिक अबोधाच्या ठेव्यातील पारंपरिक स्त्रीभानाचा प्रत्यय येतो.

तर 'निरंजन' या कवितासंग्रहामधील 'बाई, ग!' या कवितेत शंभरातील नव्याण्णव

स्त्रियांच्या जीवनातील प्रातिनिधिक दुःखाचे चित्रण वाटावे असा काव्याशय घडविण्यात आलेला आहे. पोटासाठी संघर्ष करणारी स्त्री नेटाने जीवनाला पुढे नेत राहते. रोजच्या जीवनात खूप कष्ट उपसूनही पदरात काहीही पडत नाही. जे काही एखादे फळ ओच्यात उरते तेही नाशिवंत निघते.निराशा वाढविणारे जीवन असताना उदास न होता छाती फुटेल एवढ्या दुःखाच्या डोंगराला भेदून पुढे जाते. शेजारीण व मैत्रिणींनाही धीराने जीवन जगायला मदत करते. या स्त्रीला अहेव मरण येते. याचे अप्रूपतेने वर्णन करण्यात येते. आणि 'बाई, तो अहेव माझ्या वाट्याला येवो' अशी अपेक्षाही व्यक्त केली जाते. 'अहेव मरणाचे आकर्षण' ही भारतीय विवाहित स्त्रियांच्या सामाजिक स्थानाबरोबरच त्यांच्या मानसिक घडणीचेही निदर्शक आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत पतीच्या निधनानंतर स्त्रीकडे कोणतेही सत्तास्थान नसते. एकाकीपणा व परावलंबित्वाच्या भीतीने पदरी येणारे दुःख नकोसे वाटते. आजूबाजूच्या घरातील किंवा नात्यातील विधवा वृध्द स्त्रियांना त्यांच्या कुटुंबातील घटकांकडून मिळत असलेली वागणूक पाहून आपल्याही वाट्याला असेच जीवन येईल अशी सुप्त भीती असते. त्यामुळे पतीच्या मांडीवर डोके ठेवून मृत्यू येणे, पतीचा खांदा प्रेताला मिळणे ही लौकिक घटिते मृत्यूमुळे अलौकिक सुखप्राप्ती करून देणारी असल्याचे संदर्भ स्त्रियांच्या अहेव मरणविषयक लोकगीतांतूनही येतात. प्रत्यक्षात पतीकडून फारसे प्रेमळ किंवा सुखद वागणे अनुभवाला आलेले नसल्याने स्त्रिया आपल्या अतृप्त इच्छांची पूर्तता अशा प्रकारच्या 'अहेव मरणाचे' गुणगान करणाऱ्या गाण्यांतून करून घेतात. फ्रॉईडच्या भाषेत एक प्रकारे हा वास्तव तत्त्वावर सुखतत्त्वाने मिळविलेला विजय होय. अहेव मरणाची संकल्पना दिवास्वप्नाप्रमाणे आहे. यातून स्त्रियांच्या अबोध मनातील अतृप्त किंवा दमन केलेल्या इच्छांचे दर्शन घडते. तसेच आपल्या सामाजिक संरचनेतील स्त्रियांचे दुय्यमत्वही अधोरेखित होते. तसेच स्त्रीला गृहीत धरून चालण्याची वृत्तीही लक्षात येते.

अरुणा ढेरेंच्या कवितांतील मातेचा आदिबंध हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय व्हावा इतके विपुल संदर्भ त्यांच्या कवितांतून या अनुषंगाने आलेले आहेत. कवितेतील 'मी'च्या जडणघडणीत तिच्या आईच्या संस्कारांचा, प्रेमाचा मोठा वाटा आहे. प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या आईचे संस्कार मनावर कशी छाप सोडून गेले याचे हे वर्णन पहा. 'वाती वळताना, तुपात भिजवून ठेवताना/ गीता म्हणणाऱ्या आईच्या चेहऱ्यावर/ पुष्कळदा पहिली एक जून आणि उजळ श्रध्दा/ जिच्या हलत्या सावल्या/ आयुष्यावरून सहज सरकून गेल्या' (निरंजन, पृ. ३७) प्रस्तुत कवितेत सश्रध्द मन असलेली आई भेटते. आईच्या वाती वळणे, त्या तुपात भिजवून ठेवणे या छोट्या छोट्या कृतींतून तिची देवाविषयीची निष्ठा कळते. गीता म्हणणारी आई या ओळीतून आई गीता वाचत नाहीये तर म्हणते आहे. आईचे गीतेतील श्लोक तोंडपाठ असल्याचे सूचित होते. निश्चितच त्या श्लोकांचा भावार्थ तिला ठाऊक असणार. अशा सश्रध्द व चिंतनशील प्रगल्भ आईचा प्रभाव कवितेतील 'मी'च्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला आहे. परंतु कवितेतील 'मी'वर आधुनिक जीवनजाणिवांचा

अधिक प्रभाव आहे. आईप्रमाणे निखळ श्रध्दाभाव आपल्यात निर्माण होत नाही. यासाठी काय करावे हे कळत नाही असे ती देवाला बोलून दाखवते.

'मंत्राक्षर' मधील 'दुःखाचा उखाणा' या अष्टाक्षरी छंदातील कवितेत आई व मुलगी यांच्या नात्यातील वीण सुंदर गुंफलेली असल्याचे चित्रण करण्यात आलेले आहे. मुलीच्या लग्नानंतर मुलीच्या घरी आईचे जाणे होत नाही. परंतु मुलगी आईकडे माहेरपणासाठी येत असते. आपल्या मुलीला काय काय देता येईल? याचा विचार आईच्या मनात सतत सुरू असतो. मुलीच्या आवडीनिवडी ओळखून तिला सुखद वाटेल, मनःशांती मिळेल असे मायेचे उबदार वातावरण निर्माण करून देण्यासाठी आईची धडपड सुरू असते. किंबहुना छोटी जाईची वेल मुलीला जाईच्या फुलांची आवड असते म्हणून आईने आवर्जून लावलेली असते. असा मुलीच्या छोट्यात छोट्या सुखाचा विचार करणारी आई मुलीवर जीवापाड प्रेम करते हे यातून स्पष्ट होते. एकीकडे मुलीला भरपूर सुख देणारी आई वैयक्तिक जीवनात अनेक दुःखांना सहज सामोरी जात असते. मुलीसाठी सुख व दुःखाला ती सहजपणे वेगळे करीत असते. आई दुःखे पेलीत आनंदी जीवन जगते, इतरांना आनंद देते हा आईचा वारसा आईकडून आपल्याला मिळाला असल्याचे भान 'मोर नाचतो दारात तुझा निरोप सांगतो। तुझ्या दुःखाचा उखाणा माझ्या ओटीत सांडतो।' (मंत्राक्षर, पृ.२२) अशा शब्दांत व्यक्त होते. प्रस्तुत कवितेत 'मोर' हे मनाचे प्रतीक म्हणून येते. एक स्त्री म्हणून आईच्या वाट्याला आलेल्या दुःखाचा भोगवटा हा स्त्रीजीवनाची अपरिहार्यताच होय; हे सामाजिक धारणेतील परंपरागत गृहितक येथे प्रमाण मानल्याचे दिसते. 'ओटी भरणे' ही सुखद आनंददायी कृती असते. कवितेत मात्र दुःखाच्या उखाण्याने ओटी भरण्यात येते. म्हणजे मुलीने आईच्या भूमिकेत प्रवेश केला की, तिला दुःखाच्या रूपांतरणाला सामोरे जाण्यासाठी सिध्द व्हावे लागते. हे पारंपरिक स्त्रीभान सूचकतेने व्यक्त करण्यात आलेले आहे.

जेव्हा-जेव्हा कवितेतील 'मी' दुःखी, कष्टी होते त्यावेळी मनाला आलेली उदासीनता घालविण्यासाठी ती आपल्या आईची आठवण करते. फारच कठीण व दुःखद प्रसंगांतून बाहेर पडण्यासाठी ती आईने सोसलेल्या वनवासाची दृश्ये डोळ्यांसमोर आणते. उदाहरणार्थ, 'आणि मी आठवते आईचा वनवास/ की कसे तिचे साहणे, ठाम वाट पाहणे/ फुटत जातानाच एकाग्र होत जन्म सांभाळणे, वाढवणे.../ आई, बाई ये, उतर दृष्ट अवघ्या जगण्यची/ की तलखी मिटो, दुःखाला ओल मिळो फळण्याची' (निळ्या पारदर्शक अक्षरात, पृ.६२) आईच्या दुःखातून वाट काढीत जगण्याच्या तऱ्हेतून स्त्रीमनाचे प्रातिनिधिक प्रतिबिंबच होय. हे पारंपरिक स्त्रीभान भारतातील कुटुंबसंस्थेला भक्कम, मजबूत बनविण्यासाठी कारणीभूत ठरते. भारतीय कुटुंबव्यवस्थेचे वेगळेपण या प्रगल्भ जीवनविषयक स्त्रीजाणिवांत आहे.

आईच्या व्यक्तिमत्त्वाशी एकरूपता साधलेल्या मुलीने आईप्रती असलेल्या प्रेम, भावना, विचारांचा काव्यात्मक विधानांतील आवेग 'मायबाई' या कवितेत अनुभवाला

येतो. आईने अनेक वंचनांतून मार्ग काढला, कुणाकडेही सहानुभूती मागितली नाही. मनाला टोचणाऱ्या अनेक गोष्टी घडल्या, दुःखे भोगलीत मात्र कुणालाही जबाबदार धरले नाही, की दैवालाही दोष दिला नाही. मुलीला आईच्या या वागण्याचे मोठे अप्रूप वाटते. दुःख सोसूनही इतरांना नेहमीच सुख, आनंद देण्याच्या आईच्या अशा विशेष वागण्याची तऱ्हा मुलीसाठी प्रेरणा बनली. मुलीने आईकडे मागितलेले हे अनोखे मागणे पहा - 'तुझ्या सरत्या रक्तमासाचा रंग उतरतो माझ्या गर्भाशयात/ मीपण फुटून माया झरो/ सरो सहज सोसण्यामधून एक एक आंतरकळ/ तान्ह्या शब्दाच्या टाळूवर/ तुझा तेल माखला हात फिरो' (निरंजन, पृ.११२) बालपणी आईने दिलेले सुख,प्रेम विशेष स्वरूपाचा आनंद देणारे होते. अबोध मनात त्या प्रेमाच्या सुखकर स्मृतींचा खोलवर परिणाम झालेला असल्याने तेच प्रेम, सुख व आनंदाचा आशीर्वाद आईची कृपादृष्टी कायम राहो व आपले 'मीं'पण फुटून माया झरो ही अपेक्षा व्यक्त होते. आपल्या सर्व प्रकारच्या सृजनक्षमतेशी आईची नाळ जुळलेली असल्याचा भाव यातून सूचकतेने व्यक्त होतो.

**५. स्त्री-पुरुष नात्यातील ताणेबाणेः**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून पती-पत्नी, आई व मुलगा या दोन स्त्री-पुरुष नात्यातील ताणेबाणे अधोरेखित करणारा आशय घडविण्यात आलेला आहे. आई व मुलगा यांच्या नातेसंबंधावर एक कविता असून बहुतांश कविता या पती-पत्नीच्या नातेसंबंधाचे सूक्ष्म पदर उलगडून दाखविणाऱ्या आहेत. या कवितांतील 'मी' म्हणजे पत्नी व तिचा पती यांच्यात शाब्दिक, भावनिक मतभेद असूनही ते एकत्रित राहतात. कौटुंबिक सहजीवनात अनेक पेचप्रसंग येतात. पती-पत्नीत दुरावा निर्माण होतो. हा दुरावा अनेक वर्षांचा असतो. पतीच्या आठवणींचा विरह, त्याच्याकडून सांत्वनाची व समजूतदारपणाची अपेक्षा व्यक्त केली जाते. पतीचे परतणे, परस्परांचा मानसिक पातळीवर स्वीकार, विश्वास व समजून घेण्यातील अपूर्णता, पतीकडून मिळालेल्या प्रेमाचे कठोर परीक्षण, सुखी सहजीवनाचे चित्रण अशा प्रमुख घटितांतून पती-पत्नीतील नात्याचे स्वरूप समोर येते. यापुढे त्यातील सूक्ष्म बारकाव्यांसह सोदाहरण विश्लेषण करू.

**५.१ कौटुंबिक सहजीवनातील पेचप्रसंगः**

कौटुंबिक पातळीवर पती-पत्नीत छोट्या छोट्या गोष्टींवरील मतभेदांतून सहज सुटून जाणारी भांडणेही होतात. मात्र यात एक विस्तव झाले तर दुसऱ्याने पाणी व्हावे अशा अर्थाची एक म्हण आहे. परंतु माघार घ्यायला कुणीच तयार नसेल तर मात्र कटुता वाढत जाते. बऱ्याचदा अहंकारातून निर्माण झालेल्या हेव्यादाव्यांमुळे पती-पत्नीतील मधुर संबंधात वितुष्ट्य निर्माण होते. बहुदा स्त्रीच अशा परिस्थितीत माघार घेत असते. पतीच्या अहंकाराला गोंजारत आतल्या आत धुमसत असते. कवितेतील 'मी' म्हणजे पत्नी ही योग्य-अयोग्यतेच्या कसोटीवर विचार करणारी असल्याने तिच्या पतीशी योग्य गोष्टींच्या आग्रहास्तव झगडते. यातून उडालेले खटके दोघोंच्याही मनावर आघात करणारे ठरतात. अतिशय हौशीने जीव

पाखडून घेतलेली एखादी नाजूक वस्तू फुटून गेल्यावर होणाऱ्या अतीव दुःखाप्रमाणे दोघांतील मधुर संबंधांचा क्षण हातातून निसटून फुटून गेल्याची जाणीव होताच कवितेतील 'मी'च्या मनाला मोठा धक्का बसतो. एकाच घरात वावरताना पतीचे अबोल होऊन वावरणे आणि त्याच्या व तिच्यातील सुखी सहजीवनाला तडे गेल्याचे हे वर्णन पहा 'तू स्वतःच्याच विचारांमध्ये बुडालेला/ त्रस्त, अशांत, काळवंडलेला/ डोळ्यांतल्या धगीची निवलेली वाटते वाफ,/ किंचित झुकत्या खांद्याच्या आकृतीत/ समजूतदार निराशा भरली आहे/ मीही राहिले नाही म्हणा पूर्वीसारखी लढाऊ/ क्षणाची ही फुटकी काच/ बघ मीही कशी निमूट उचलून टाकली आहे' (निरंजन, पृ. ३२) शेवटच्या कडव्यात दोघेही स्वभावाने तापट असल्याची कबुली देण्यात येते. त्यामुळे शब्दाने-शब्द वाढल्याने कौटुंबिक सहजीवनात दुःखाचे आगमन झाले. शेवटी हे तापटपण दोघांनीही सोडल्यामुळे अगतिक व सोयीस्कर अळणी वागण्याचा स्वीकार करणे भाग पडले. आपल्याच पूर्वायुष्याकडे मागे वळून पाहिल्यावर आपण केलेले वर्तन भयंकर होते. असा उद्गार काढण्यात येतो.

'लाल चेंडू रानोमाळ' या कवितेतूनही पती-पत्नीने एकमेकांशी उगाचच संघर्ष केल्याची भावना व्यक्त करण्यात येते. वनवासातही सीता रामासमवेत राहिली. रामाने तिला सोबत ठेवले. मात्र पतीने कवितेतील 'मी'ला एकटेच सोडून दिले. पतीशिवाय एकटे राहणे तिच्यासाठी कष्टदायी ठरते. आपण मात्र दूरवर झुगारून दिलेल्या सुखाचा लाल चेंडू रानोमाळ शोधत राहिलो आहोत, अशी भावना व्यक्त करण्यात येते. सुखाचा लाल चेंडू या प्रतिमेतून हातात न गवसणाऱ्या गोष्टीच्या मागे आपण धावत असल्याची जाणीव सूचकतेने व्यक्त करण्यात आलेली आहे.

**५.२ पती-पत्नीतील दुरावाः**

पती-पत्नी एकमेकांपासून काही कालावधीसाठी विभक्त होण्याची भूमिका घेतात तेव्हा त्यांच्या नात्यात ताणतणाव निर्माण होतो. पतीचे स्वतःहून पत्नीपासून दूर होण्याचे संदर्भ 'तू म्हणत असतोस' या कवितेत आलेले आहेत. असे होताना आपल्या संबंधात आधी होती तशीच आत्मीयता राहील असे पतीला वाटते. पत्नीला मात्र यावर विश्वास की पती दूरदेशी जाईल. जेव्हा केव्हा त्याला परतून यावेसे वाटेल तेव्हा तो परतून आल्यावर आपल्या वाट्याला पुन्हा नवा बहर येईल. तिच्याप्रती त्याच्या मनात उत्कट ओढ असेल. परंतु वर्तमानात त्याच्या दूर निघून जाण्याच्या ठाम निर्णयामुळे तिला अधांतरी वाटते. तिचे मन दुखावते याचा विचार न करता तिला एकटे सोडून दूर निघण्याची तो तयारी करतो. त्याला निरोप देताना तिच्या मनाची अवस्था अतिशय हळवी होते. याविषयीचे तिने केलेले कथन पहा, 'एकमेकींत गुंतलेल्या/ दिवसरात्रीच्या नसा तुटाव्यात/ तसा तो निरोप !' (निरंजन, पृ. ६२) दिवस आणि रात्रीला वेगळे करता येत नाही. दोघांचे एकमेकांशी अतिशय घट्ट नाते आहे. दोहोंना वेगळे करणे म्हणजे कालचक्र थांबविण्यासारखे होईल. ही अतिशय अशक्य गोष्ट होय. येथे दिवस ही पतीसाठी व रात्र ही पत्नीसाठी प्रतिमा म्हणून योजण्यात

आलेली आहे. या दोहोंना वेगळे करताना दोहोंच्या एकमेकींत गुंतलेल्या नसा तुटण्याची कल्पना केलेली आहे. वास्तविक पती-पत्नीचे नाते हे काही रक्ताचे नाते नसते. ते जोडलेले असते. एकदा ते जुळले की रक्ताच्या नात्याहूनही एक वेगळी आत्मीयता, परस्परांविषयीचे प्रेम निर्माण होत असते. नसा तुटणे म्हणजे आत्मीयता व प्रेमाच्या भावनांचे बंध तुटल्याची जाणीव करून देण्यासाठी प्रस्तुत कल्पना केलेली असावी. संवेदनक्षम पत्नीच्या मनावर या निरोपाचा फारच विपरीत परिणाम झाला. मनाच्या पातळीवर स्वतःची समजूत घालणे तिला जड जाते. शेवटी तर तिला हा निरोप एकमेकांत गुंतलेल्या लसलसत्या आयुष्याच्या मुळ्या तोडणारा वाटतो.

कवयित्री 'मी बाबा रे' या कवितेत निरोपाचा सोहळा करण्यासारखे जवळ काहीही उरले नाही, अशी भावना व्यक्त करते. दिल्या-घेतल्या गोष्टींमुळे मनाच्या पातळीवर सुखद स्मृतींचा सुगंध एकेकाळी दरवळत होता. आता मात्र या नात्याची किंमत चिमूटभर कोरड्या मातीसारखी झाल्याची कबुली देण्यात येते. दूरध्वनीवर कधी बोलणे झालेच तर त्या संवादातही तुटकपणा व कोरडेपणा असतो. निर्जन वाळवंट तारेवरून सरसरतेय अशी भावना व्यक्त करण्यात आलेली आहे. नात्यांची झालेली माती व वाळूही कोरडी आहे. त्यात ओल असते म्हणजेच परस्परांविषयी आत्मीयता असती तर पुन्हा बहार आली असता. मधुर संबंधांची हिरवी रोपे रूजली असती. हे आता तरी शक्य नाही. म्हणून कोणताही हट्ट न करता परस्परांना निरोप द्यावा अशी भावना कवितेच्या शेवटच्या ओळीतून व्यक्त होते.

त्याच्या निघून जाण्याने तिला एकाकी वाटू लागते. आता त्याच्यासाठी आतड्याची माया निर्माण होणार नाही अजूनही जुन्या दिवसांकडे नव्याने बघतांना तिचे मन दुखरे होते. डोळे भरून येतात. उदासी व एकमेकांच्या उताराजवळ मन थबकून राहते. आता मला कोणीही नाही. ज्याला आसासून आपलेसे केले होते त्यानेच सारे सुख लुटून नेले. पदरात दुःखच दुःख दिले. त्याच्या अशा वागण्याने काळीज दुखून येते अशी आयुष्य सैरभैर झाल्याची अनुभूती ती व्यक्त करते. 'ओठ मिटून' या कवितेतून आपले घर कधी स्थिर केले नाही असा बोल पतीला लावण्यात येतो. शेवटी कुठेतरी थांबले पाहिजे म्हणून स्वतःची वेगळी वाट चोखाळण्याचा निर्णय घेणाऱ्या धाडसी पत्नीची प्रतिमा 'दिगंबर' या कवितेत साकारण्यात आलेली आहे.

**५.३ पतीची वाट पाहणारी पत्नी:**

आपल्या पतीच्या दूर जाण्याने त्याच्या आठवणी तिच्या मनात विरह जागा करतात. त्याने परतून यावे असे तिला मनोमन वाटत असते. तसे नभ व भुईचे मीलन पावसामुळे होते त्याप्रमाणे आपली व पतीची भेट व्हावी. ज्या मतभेदांमुळे एकमेकांपासून दुरावा निर्माण झाला होता. त्यातून कवितेतील 'मी'चा स्वतःशीच झालेल्या प्रश्नांचा संघर्ष संपला आहे. स्वतःचेच स्वतःशी असलेले भांडण संपले आहे. आता त्याने लवकर परतून यावे असे तिला मनोमन वाटते. या स्वरूपाचा आशय 'निवळ' या कवितेत आलेला आहे. त्याने

यापूर्वी दिल्या घेतलेल्या आणाभाका तिला आठवतात. विशेषतः त्याने घातलेल्या शपथांचा ती शोध घेवू पाहते. शपथांमागे असलेल्या खऱ्या प्रेमाची अनुभूती अनुभवण्याचा हा शोध किंवा अट्टाहास आहे असे म्हणता येईल. माझ्या लहानशा मनाजवळ मी एक दिवा लावतेय, असे ती म्हणते. 'मनापाशी दिवा लावणे' या प्रतिमेतून प्रेमाची सात्त्विकता व समर्पणवृत्ती सूचित होते. त्याने परतून यावे यासाठी अशी साद घालते. 'ईश्वरी वेदनेच्या अशा अंधारातून/ तू कधीतरी येशील ना?/ घेशील ना साऱ्या जगाला सारून/ मला हृदयाशी?/ या एका इच्छेजवळ/ सगळे आयुष्य ठेवते आहे मी' (निरंजन, पृ.८४)

आपल्या पतीने परतून यावे, जीवनात जी दुःखे आलीत त्यामुळे ज्या वेदना झाल्यात, त्या दुःखांची निर्मिती ईश्वराच्या इच्छेतून झालेली होती. हेच आपले भागधेय होते असे समजून ईश्वरी वेदनेचा अंधार दूर सारून त्याने परतून यावे व तिला हृदयाशी धरावे अशी अपेक्षा ती व्यक्त करते. या एका इच्छेजवळ सगळे आयुष्य ठेवण्याची कबुली देते. त्यातून तिच्या मनाची उलाघाल समजते. पतीविषयीची आत्मीयता, निरागस प्रेम व संबंधांना सर्वोच्च स्थान देण्यासाठीच्या समर्पित वृत्तीचे दर्शन घडते.

**५.४ परस्परांचा स्वीकार व सुखी सहजीवनाचे चित्रणः**

सुमारे बारा वर्षांच्या अंतराने परतून आलेल्या पतीचा मनोमन स्वीकार करण्यासाठी कवितेतील 'मी'ला मोठ्या धीर व संयमाने परिस्थितीला सामोरे जावे लागते. भूतकाळ सुकून गेल्याची जाणीव व्यक्त होते. त्याच्या रूपाने आयुष्याचा नवा भास दाराजवळ उभा राहिला आहे असे तिला वाटते. क्षणभर त्याचे परतून येणे खरेच वाटू नये अशी तिच्या मनाची धारणा होते. परंतु सत्याचा स्वीकार करून ती त्याला घरात घेते. त्याच्यासाठी देहाचे तोरण सजवते. मनाच्या पातळीवर स्वतःला पुन्हा नात्यात गुंफताना तिला त्रास होत असल्याचा भाव 'पुन्हा दुःखाचे सोहळे!' या सारख्या उद्गारातून व्यक्त होतो.

त्याच्या मनाची उदासीनता मात्र कमी झालेली नाही. ती कशी घालवावी हा प्रश्न तिच्यासमोर आ वासून उभा असतो. कितीही प्राणांतिक बळ आणून स्वतःला उभे केले तरी त्याची उदासीनता ओलांडण्याची तिला शाश्वती वाटत नाही तिचे मन मात्र त्याच्याकरिता भरून आलेले आहे. तिने त्याचा स्वीकार खुल्या मनाने केल्यानंतरही त्याच्याकडून जाडे-भरडे बोलणे थांबलेले नसते. ती त्याच्याकडून समजूतदारपणाची, तिच्याप्रती सांत्वनाची अपेक्षा व्यक्त करते. हळूहळू त्याच्याही वागण्यात होत असलेले बदल तिला आल्हाददायी वाटू लागतात. या सर्व घडामोडीत त्याच्याकडून केल्या जात असलेल्या प्रेमाचे ती तटस्थपणे परीक्षण करू लागते. त्यात सच्चेपण आढळून आल्यावर ती आपल्या सुखी सहजीवनाचा आनंद घेवू लागते. विखरलेले संवाद जुळून आलेत. एकाकीपण व उदासीची जागा प्रसन्नतेने व आनंदाने घेतली. जीवन भरभरून जगत असल्याची अनुभूती 'प्रसाद' या कवितेतून व्यक्त केलेली आहे. सुरेख सहजीवनाविषयीचे हे वर्णन पहा. 'आता माझ्या मोकळ्या हातात हात माळशील/ तर निखळून पडलेल्या नात्यांसकट/ जन्मविद्ध सगळे काही,/

वाऱ्याबरोबर, पावसाबरोबर/ आपल्यामधून सांधून नेईन/ संवादाचा हा सुरेख चमकता तातू/ प्रसाद म्हणून मनगटावर बांधून घेईल' (निरंजन, पृ.११०)

शेवट कवितेतील 'मी' म्हणजे पत्नीच संवादाला सुरेख करण्याचा प्रयत्न करताना दिसते. अखेरीस तिच्या प्रयत्नांना यश येते. सुखी सहजीवनासाठी संवादातील सुरेखता दोघांनीही जपली पाहिजे. ही मूल्ययुक्त जाणीव कवितेतून सूचकतेने मांडण्यात आलेली आहे. थोडक्यात अरुणा ढेरेंच्या कवितांतून चित्रित करण्यात आलेल्या स्त्री-पुरुष नात्यांतील ताणेबाणे पती-पत्नींतील नातेसंबंधांच्या सूक्ष्म छटा दर्शवितात. त्यातील संघर्ष, प्रेम, समर्पणवृत्ती व नात्याला दिलेले सर्वोच्च स्थान यामुळे आपल्या भारतीय समाजातील कुटुंबसंस्थेच्या अंतरंगाची झलक त्यातून ठळकपणे प्रत्ययाला येते.

**६. स्त्रीसुलभ भावनांची तरल अभिव्यक्ती:**

स्त्री म्हणून असलेले स्त्रीचे वेगळेपण हे जसे जैविक पातळीवर असते तसेच सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या तिच्या व्यक्तिमत्त्वाची घडणही वेगळी होते. ढेरेंच्या कवितेत भारतीय स्त्रीजीवनातील विशिष्ट जीवनानुभवांचे आविष्करण करण्यात आलेले आहे. 'आतल्या आत संपत जाणे' या कवितेत प्रौढ स्त्रीचा कासाराकडून बांगड्या भरून घेतानाचा अनुभव प्रतीकात्मक चित्रणासाठी योजलेला आहे. बांगड्या / चुडा हा स्त्रीच्या सौभाग्यलेण्यांपैकी एक मानला जातो. भारतीय परंपरेत प्रथम चुडा भरला जातो तो विवाहप्रसंगी. विवाहित स्त्री आपल्या संपूर्ण आयुष्यभर पती जिवंत असेपर्यंत हातात चुडा भरत असते. एखादी सासुरवाशीण माहेरी आल्यानंतर तिला नवीन बांगड्या भरून दिल्या जातात. याचप्रमाणे विवाह सोहळ्यासारख्या आनंदप्रसंगीही ज्यांच्या जवळच्या नात्यातील विवाह आहे. अशा व्यक्तींच्या कुटुंबातील सौभाग्यवती स्त्रियांना सन्मानाने बांगड्या भरण्यात येतात. मागील पिढीतील स्त्रियांना आपल्या चुड्याचे अप्रूप असे. काचेच्या बांगड्या भरून घेण्यासाठी धनिक स्त्रियांच्या घरी कासाराला बोलावले जात असे. सर्वसामान्य स्त्रिया आठवडे बाजारात किंवा कासाराच्या दुकानात जावून बांगड्या भरून घेत असत. या बांगड्या प्रामुख्याने काचेच्या असत. कष्ट करणाऱ्या स्त्रिया घट्ट चुडा भरतात. हात भरून बांगड्या भरून घेण्याकडे कल असे. काम करताना बांगड्या फुटतात. घट्ट चुडा भरण्यासाठी कासाराला दिलेला हात अनेकदा बांगड्या भरताना फुटलेल्या बांगडीच्या काचेने सोलवटून निघतो. सांस्कृतिक चिन्ह म्हणून चुड्याला असलेली मान्यता (पती जिवंत असल्याची खूण) पाहता या वेदना सहन करून घेण्याशिवाय पर्याय नसायचा. बांगड्या भरून घेताना झालेल्या वेदनांनी डोळ्यांत पाणी भरून येते, पण तोंडातून चकार शब्दही न उच्चारता हे दुःख सोसण्याची वृत्ती स्त्रीला पुरुषाहून वेगळी बनवते. हेच आपले भाग्यधेय आहे असे मानणाऱ्या स्त्रीच्या भावनांची तरल अभिव्यक्ती म्हणून पहा. 'कितीकदा तर कासाराला द्यावा हात/ आणि स्सऽ देखील न उच्चारता सहन करावा रूतण्याचा दाब/ सुखाची किणकिण ऐकण्याची असोशी मनात ठेवून/ डबडबल्या डोळ्यांनीच,/ तसा द्यावा लागतो

आयुष्याला हात/ अन् कुठल्या तरी अनपेक्षित आघाताने मोडते नादाची लय/ होते वर्खाच्या उजाळ्याची वाताहत/ हेही पहावे लागते नंतर, अगदी निमूट, घट्ट बंद ओठांनी' (जावे जन्माकडे, पृ.४०)

पुरुषांच्या वाट्याला न येणारी ही खास स्त्रीविशिष्ट भावनांची तरल अनुभूती, तिला असलेले वेदनांचे संदर्भ स्त्रीजीवनानुभवाची व्यापकता दर्शविते. 'सहन करीत राहणे' हा बाईचा प्रकृतिधर्म बनत गेला. तोच तिच्या बाईपणाची ओळख म्हणून समाजात रूजला. 'सुखाची किणकिण ऐकणे' या प्रतिमेतून तिने दुःखातूनही सुखाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. असा आशय ध्वनित करण्यात आलेला आहे. नित्याच्या जीवनात जुळून आलेली सुखाची घडी विस्कटून टाकण्यासाठी अनपेक्षित आघात होतात. त्यामुळे सुरळीतपणे चाललेल्या जीवनाला अवकळा येते. अनेकदा वाताहत होते. याकडे घट्ट बंद ओठ मिटून निमूटपणे पाहत रहावे लागते. प्रस्तुत कवितेत दुःख व्यक्त करण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक म्हणजे शरीर पातळीवरील दुःख व्यक्त करण्यासाठी कासाराला हात देण्याने बांगड्या भरताना होणाऱ्या रूतण्याच्या दाबाचे आहे. तर दुसरे दुःख कासाराला हात दिल्याने जसे दुःख पदरी पडते 'तसा द्यावा लागतो आयुष्याला हात' यामुळे वाट्याला येते. येथे स्त्रीच्या जीवनातील दुःखाची निर्मिती कशी होते? या प्रश्नाच्या उत्तराचा एक शोध या संहितेआधारे घेता येतो. बांगड्या भरण्याची एक परंपरा आहे, ज्यातून स्त्रीला बांगड्या भरून घेताना वेदना होतात. आधुनिक काळात हातभार बांगड्या भरून घेण्याची पध्दत मागे पडत जावून एखादी बांगडी (जी काचेची असेलच असे नाही) घालण्याची नवी अलंकार धारणशैली स्त्रियांनी विकसित केलेली आहे. असे करण्यासाठी स्त्रियांनी आपल्या शैक्षणिक विकासाबरोबरच निवडीच्या स्वातत्र्यांचाही पुरस्कार केलेला दिसतो. मूकपणे धुमसत जगणारी सोशिक वृत्तीची स्त्री मुक्तपणे स्वतंत्र निर्णय घेवू लागल्याने तिच्या दुःखाला कारण ठरणाऱ्या बांगड्या भरण्यासारख्या धारणांनाही ती शह देवू लागली आहे. त्यामुळे कासाराला हात देणेही कमी झाले आहे. (अद्यापही खेड्यातील स्त्रिया याला अपवाद आहेत) आयुष्यात रूढीने किंवा धारणांमुळे निर्माण होणारी दुःखेही कमी झालेली आहेत. मात्र एकोणिसाव्या शतकातील स्त्रिया जीवनाची ससेहोलपट, घुसमट, आंतरिक पातळीवरील तिचे कोलमडणे, दुःखैनैव एकटेपण यामुळे तिच्या मनात उठणाऱ्या भावनिक आंदोलनाची स्पंदने अरुणा ढेरेंनी अचूक टिपलेली आहेत.

'प्रेमासाठी' या कवितेत सहनशील नायिकेच्या मनातील प्रेमभावाचे चित्रण करण्यात आले आहे. कवितेतील 'मी' संवादी स्वरूपात अवतरते. समर्पण वृत्तीने प्रेमात डुंबलेली नायिका आपल्या प्रेमाच्या नात्याला हळुवारपणे जपते. आयुष्यात आलेल्या दुःखप्रसंगांना तोंड देण्यासाठी हिंमतीने सामोरे जाते. नात्यांना जपण्याची असोशी अशा प्रकारे व्यक्त होते 'मी नखलत नाही शिरा कोवळ्या ओल्या,/ दुमडून कडांना दुखावत नाही देठ/ मी फक्त ठेवते उजेड हिरवा आत/ अन् प्रेमासाठी मिटून घेते ओठ' (जावे

जन्माकडे, पृ.६९)

कोवळ्या शिरा नखलणे ही क्रिया गवारच्या शेंगा निवडताना करावी लागते. गवारची भाजी बनविण्यासाठी गवारच्या शेंगा विशिष्ट पध्दतीने निवडून घ्याव्या लागतात. त्यासाठी स्वयंपाक घरातील विशिष्ट अनुभव कामी येतो. कोवळ्या शेंगांना शिरा नसल्याने त्या निघत नाहीत. देठातही त्या कोवळ्या असतात. कोवळ्या शेंगाचा विचार ज्या हळुवारपणे कवितेतील 'मी' करते त्याच हळुवारतेने प्रियकराशी केलेल्या वर्तनातील हळुवारपणा दर्शविण्यात आलेला आहे.

पारंपरिक स्त्रीजीवनातील अनेक अनुभव ढेरेंच्या काव्याभिव्यक्तीचे वेगळेपण दर्शविणारे आहेत. आई, आजी, मुलगी, बाई या स्त्री व्यक्तित्वांशी केलेल्या हृदयसंवादाची प्रतिबिंबे त्यांच्या कवितांत उमटलेली आहेत. त्यातून पारंपरिक स्त्रीभान जसे व्यक्त होते तशीच स्त्रीच्या वाट्याला आलेल्या अपरिहार्य दुःखाची सकारात्मक स्वीकारशील वृत्तीही प्रकट होते. पती-पत्नीतील विरह, विसंवाद, भावनिक संघर्षाची आंदोलने, दीर्घ दुराव्यानंतर झालेल्या घुसमटीचे अनुभव काव्याशयाचे रूप घेतात. कवितेतील 'मी'चा आध्यात्मिक पिंड आहे. अलौकिक अनुभूतींचा प्रत्यय घेण्यासाठी विठ्ठल, रूक्मिणी, संत जनाबाई यांच्याशी हृदयगत करून अलौकिक स्त्रीविशिष्ट अनुभवांची अभिव्यक्ती करण्यात आलेली आहे. आपल्या परंपरेशी नाळ जुळवून घेण्याचा हा प्रयत्न मराठी कवितेचा काव्याशय समृध्द करणारा ठरलेला आहे.

**७. दैहिक अनुभूती:**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून शरीर संवेदनांविषयीच्या अनुभूतींचे आविष्करण संयतरित्या व सूचकतेने करण्यात आलेले आहे. तारुण्यात व प्रौढावस्थेतही शरीरात होणारे बदल हे मनाशी संवाद करतात. या मानसिक भावांना अभिरूप करताना भोवतालच्या निसर्गातील पक्षी व पर्यावरणातील बदलांचे सूक्ष्म निरीक्षण देहभाषेच्या अभिव्यक्तीसाठी पूरक ठरते. पुरुष कवींच्या कवितेत न सामावलेला काव्याशय स्त्रीमनातील भावनिक हिंदोळे, शरीर संवादाच्या सुखद अनुभूती, स्त्रीला वाटणारे अप्रूप, तिची समर्पणावृत्ती व तटस्थता असा व्यापक अवकाश दैहिक अनुभूतींच्या प्रकटीकरणातून प्रत्ययाला येतो.

'पक्वतेचा आवेग' या कवितेत शरीर बदलांना सामोरे जाताना प्रौढ स्त्रीच्या मनात झालेली उलाघाल व देहाची घालमेल यांचे सूचक चित्रण करण्यात आलेले आहे. आपल्याला पक्वतेचा आवेग सोसणे कठीण होत आहे, किंबहुना तो सहन होत नाही हे सांगताना हिरव्या मरणछायेतल्या केळी जशा गोडव्याने रसरसलेल्या आहेत तशी अवस्था कवितेतील 'मी'ची झालेली आहे. केळी पिकली की तिचा अख्खा दांडाच सुकून तो उन्मळून पडतो. इतरांसाठी रूचकर गोड केळी उपलब्ध होतात. मात्र मूळ केळीचे झाड फळ पक्व झाल्यानंतर स्वतः संपून जाते. त्याचप्रमाणे स्त्रीच्या देहाचेही आहे. तिचे पक्व होणे, तिने देहाचा उत्सव पतीसाठी आयुषभर साजरा करणे आणि खूप सारी गोडी केळीप्रमाणे

वाटून स्वतःचे सर्वस्व पतीला अर्पण करणे, यातून त्याग व समर्पण वृत्तीचे दर्शन घडते. आपल्या शरीर प्रतिक्रिया ज्याप्रमाणे कबुतरे गळ्यातून विशिष्ट प्रकारचा ध्वनी काढून देतात आणि त्यात ते बेभान होऊन जातात त्यांच्याशी भावनिक अनुबंध जोडणारा हा काव्याशय पहा. 'कबुतरांच्या तीव्र बेभान गळ्यात/ घुमतो आहे भरून भरून उष्ण ऋतू/ उन्हाने तट तटलेला भवताल/ तटतटून माझे घर, माझे-शरीर/ आतबाहेर' (जावे जन्माकडे, पृ.४१)

नैसर्गिक भावनाभिव्यक्तीला वाट करून देण्याचा धीट प्रयत्न म्हणून या कवितेची संहिता आकाराला येते. शरीराचे सुखद बोलणे ऐकण्यासाठीची संवेदनक्षम अभिवृत्ती, कबुतरांचे बेभान होऊन गुटर घूऽ करणे, भवतालचे तटतटणे यापुढे जावून घराचे तटतटून येणे व शेवटी शरीराचे आतबाहेरून तटतटून येणे या वर्णनातील क्रम, संगती पाहिली तर शेवटी शरीराच्या आतबाहेरून तटतटण्याचा संदर्भ येतो. मात्र ही दैहिक अनुभूती सुखकारक होत नाही. पक्वतेनंतर उन्मळून पडणाऱ्या केळीप्रमाणे तिचाही लय होतो. असा सूचक आशय प्रस्तुत कवितेत घडविण्यात आलेला आहे.

'संपृक्त' या कवितेत समागमाचे वर्णन विलक्षण संयमित, सूचक तऱ्हेने करण्यात आलेले आहे. स्त्री-पुरुषातील शरीर संवाद आदिम काळापासून होत आहे. त्यातील रांगडेपण, उत्कटता, नैसर्गिक आवेग, भावनिक एकरूपतेचे आविष्करण एवढेच हे वर्णन नाही. उदाहणार्थ, 'त्याच्या बळकट हातांवर ती/ खाली खडकापर्यंत लोटलेला/ तिच्या केसांचा चमकता अंधारलोट/ गरम इच्छांसारखे पिवळेजर्द गवत सर्वत्र/ आणि मस्तीने धुमसणाऱ्या उन्हासारखे/ तिचे शरीर तिचे ओठ/ अजस्त्र देवदारच जसा त्याच्या उत्तुंग आवेग/ स्नायूंचे जोरकस वादळी उठाव/ झऱ्याचा उगम तसा उद्दाम वासनेतून उफाळत/ इतिहास मागे टाकणारा त्याचा अहंभाव' (जावे जन्माकडे, पृ.४४)

आदिम काळातील पुरुषांकडून स्त्रियांवर होणाऱ्या हल्ल्यांपासून तर सामाजिक अवस्थेत आल्यावर पुरुषांत आलेले संयमितपण, स्त्री समवेत कसे वागायला हवे याचे शहाणपण आल्यानंतरच्या काळातील पुरुषातील मानसिक बदल दर्शविणारे हे वर्णन समाज-संस्कृतीच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण घटित होते. त्यामुळे लग्नसंस्था स्थापित होऊन कुटुंबाची संकल्पना अधिक जोरकस, बळकट झाली. पुरुष जो मुळात हिंस्त्र होता, शिकारी होता, त्याला स्त्रीने शरीर संवादातून 'माणूसपण' बहाल केले. त्याच्यातील हिंस्त्रता हळूहळू घालवून त्याच्या पुरुषी अहंभावाचेही हरण तिने केले. हा काव्याशय समकालीन मराठी कवितेचे अर्थक्षेत्र व्यापक करणारा आहे. शरीर संवादाची स्त्रीला पुरुषासारखी निकड नाही, ती त्याशिवायही सहज, शांत, सुंदर जीवन जगू शकते याचे वर्णन पहा. 'नंतर ती पुन्हा उभी, श्रांत/ तुडुंब पाहणारी थकून पडलेल्या त्याच्याकडे/ त्याच्यासाठी त्याच्याशिवायही आता संपृक्त/ तृप्त' (जावे जन्माकडे, पृ.४४) तरल दैहिक अनुभूतींचे वर्णन या कवितेत करण्यात आलेले आहे. त्यातून नैसर्गिक शरीर संवादाने स्त्री-पुरुष

नात्यातील बंध घट्ट होत जातात. स्त्री ही नेहमीच पुरुषाशी समर्पणभावाने वागते. तिच्या समर्पण वृत्तीतून पुरुषातील संवेदनक्षमवृत्ती जागृत होते. पुरुषत्वाला ती सार्थ बनवते. अशा संपृक्त व तृप्त स्त्रीमनाचे वेगळेपण ठळक ठरते.

'ध्यास' या कवितेतही शरीर संवादाची विलक्षण वेगळी सुखानुभूती प्रकट करण्यात आलेली आहे. यातील रतिभाव मधुरा भक्तीची आठवण करून देणारा आहे. कवितेतील 'तो' म्हणतो, 'रेषांमध्ये मावत नाही असे अंग तजेलदार/ आणि अवयवांमधल्या नाजूक अंधाराची/ वळणदार लयकारी/ कैवल्याच्या गाभ्याला फुटावा तसा रतीचा कोमल दरवळ/ आणि ज्योतीच्या देठापाशी मिटावी वात, तशी/ अर्पणाची तऱ्हा गहिरी' (निळ्या पारदर्शक अंधारात, पृ.५२) तिने त्याला अलगदपणे सादर केलेला शरीर उत्सव, त्यात त्याचे हरवून जाणे इतके विलक्षण की, त्याला रतीचा कोमल दरवळ कैवल्याच्या गाभ्यातून निघणाऱ्या दरवळाची अनुभूती देणारा वाटतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ठेवण आध्यात्मिक असल्याने या अद्वैत आनंदाचे रूपडे तो अनुभवू शकला असेल असे म्हणता येते. तिच्या गहिऱ्या समर्पण वृत्तीमुळे त्याला त्याच्या साऱ्या लौकिक सुखांना विसरता येते. मनाची नवेली अनुभवल्यावर तिचे रूप त्याला झळकणाऱ्या कोंदणासारखे वाटू लागते. शरीर संवादातून दिव्य स्पर्शाची अनुभूती घेण्यासाठीची असोशी मूळमायेच्या महाशून्यापर्यंत घेवून जाईल अशी तीव्र इच्छा तो प्रकट करतो. तरल दैहिक अनुभूतींचे असे आविष्करण वाचकांना विस्मयचकित करणारे, मानवी जीवनव्यवहाराकडे अधिक सूक्ष्मतेने पाहायला लावणारे, स्त्री-पुरुष नात्याला अधिक बळकटी देणारे, दैहिक अनुभूतींकडे अलौकिक दृष्टीने पहायला लावते. त्यामुळे वाचकाला एक डोळसपणाची अनुभूती येते.

**८. प्रेमानुभूतींचे आविष्करणः**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून प्रेमविषयक जाणिवांचे अनेकविध अनुभूतींत आविष्करण करण्यात आलेले आहे. कवितांच्या अभ्यासातून 'प्रेम' संकल्पना, प्रेमविषयक दृष्टीकोन, प्रेमानुभवाचे विविध दाखले, विरह व मीलनाचे उत्कट वर्णन, युवतीच्या अवखळपणाचे वर्णन, धीट साजणाच्या मीलनाचे वर्णन स्त्री-पुरुषांतील परस्परांविषयीचे आकर्षण, प्रेमात असलेल्या प्रेयसीची पारंपरिक प्रतिमा, स्त्रीची समर्पण वृत्ती अशा अनेकविध विशेषांचा प्रत्यय येतो. पारंपरिक प्रेमानुभूतींचे संदर्भ अधिक येतात. त्याचप्रमाणे कवितेतील रूपदृष्ट्या अपारंपरिक प्रेमानुभूतींचा अविष्कार वेधक आहे. या सर्व विशेषांबाबतचे सोदाहरण विवेचन यापुढील भागात करूया.

'प्रेम म्हणजे' या कवितेतून प्रेमाची संकल्पना सुखाबरोबरच दुःखाच्या ओरखड्यांनी आकाराला आलेली आहे, तिने त्याला दिलेल्या स्नेहाच्या बदल्यात तिला तितका उत्कट स्नेहाचा परतावा मिळत नाही. थोड्याशा पदरी पडलेल्या सुखानुभूतींचा ठेवा, त्यांचे रंग गंध व चवही हरवत गेल्याचा अनुभव आल्याने हृदयातून ती दुखावली जाते. त्याच्याकडून झालेल्या आघातांनी, मन हिणवले गेल्याने ती उदासीनेतच्या खोल अंधाऱ्या दरीत आपण

आपण ढकलले गेल्याचा अनुभव सांगते. त्याचे अहंकारी असणे, त्याने दुरावा धरणे, विरहाचे चटके बसतील असे वागणे यातून परस्परांतील विसंवाद वाढत जावून एकमेकांच्या सदिच्छाही पस्परपरांपर्यंत पोहोचेनाशा होतात. प्रेमाचा कडवट अनुभव घोटून झाल्यावर तिने व्यक्त केलेली ही भावना पहा. 'प्रेम म्हणजे काळाच्या सोंडेने/ श्रीहरीसाठी तोडलेलं कमळ होतं समज/ म्हणजे दुःखाच्या मगरीनं कातडीत रोवलेले दात/ धीरानं स्वीकारता तरी येतील' (निळ्या पारदर्शक अंधारात, पृ.१३) आपल्या आयुष्यात वाट्याला आलेले प्रेम हे कमळाच्या फुलासारखे होते. प्रेम हे काही आपल्याला मिळालेले वरदान ठरले नाही, तर काळानेच ते फुलल्याबरोबर त्यावर झडप घातली. त्याला खुडले, आपले प्रेम फुलताना, बहरताना खुरटले असे म्हणण्याऐवजी स्वतःचीच समज घालताना ते श्रीहरीसाठी तोडलेले कमळ समजावे, हा तिचा सकारात्मक दृष्टिकोनच तिला सावरतो. यामुळे जीवनात आलेली दुःखे सहन करण्याची क्षमता आपोआप तयार होते. किंबहुना 'दुःखाच्या मगरीनं कातडीत रोवलेले दातही धीरानं स्वीकारता तरी येतील' या शेवटच्या ओळींतून आपले जीवन हे दुःखरूपी मगरीचे भक्ष्य आहे. ज्याप्रमाणे मगरीच्या दातांत एखादे भक्ष्य सापडते तेव्हा त्याचे निसटणे बहुदा अशक्यच असते. तसेच आपल्या प्रेमानुभवामुळे जीवनातील दुःखाचेही हटणे, निसटणे अशक्यप्रायच होय. त्यातून निर्माण झालेल्या वेदनांसहित जगणे अपरिहार्य असल्याची प्रगल्भ परंतु दुखऱ्या प्रेमविषयक जाणिवेचे दर्शन यातून घडते.

दोहोंतील दीर्घ काळातील दुराव्यानंतरही तिच्या मनात त्याच्याबद्दलची आस टिकून असते. लालसेने, आनंदाने किंवा द्वेषाने अशा कोणत्याही कारणाने विलगलेल्या गरम ओठांचे मध्यंतर कुठे जाते? असा भावनिक प्रश्न ती उपस्थित करते. जागून झालेल्या दुःखद स्मृतींना उजाळा देते. त्यांचे परतून येणे दिलासादायक असले तरी ज्या हातांनी आयुष्य विस्कटून टाकले होते त्याच हातांना जिवलग म्हणून हातात घेताना ती बिचकते. मात्र क्षमाशील वृत्तीने त्याला आपलेसे करते. त्याच्याकडून समंजसपणे वागण्याची अपेक्षा करते. उदाहरणार्थ, 'तू घेणार आहेस समजून/ माझी वारंवार होणारी वाताहत/ आणि माझ्या अटळ पडझडीसाठी/ कणखर कोवळीक आहे तुझ्या जवळ असण्यात/ म्हणूनच फक्त स्वीकारत जाते आहे/ काळाचा अविनाशी अवघडपणा/ अन् करते आहे प्रेम नावाचा सहृदय गुन्हा/ पुन्हा पुन्हा' (निरंजन, पृ.९४)

प्रेमात तिची होणारी वाताहत, अवहेलना, तिला वेदना सहन करताना भावनिक आधाराची निकड असते. तेव्हा प्रियकराची 'कणखर कोवळीकता' ही सहवासातून लाभते. ती असेल तर कितीही कठीण संकटांचा धीरोदत्तपणे सामना करता येईल. यासाठी प्रेम करण्याचा सहृदय गुन्हा मी पुन्हा पुन्हा करेन. असा विश्वास ती व्यक्त करते. 'हातात हात घेताना' या कवितेत प्रेमाच्या सुखानुभूतीचा प्रत्यय आल्याचा अनुभव मांडण्यात आलेला आहे. साजणाचा हात हातात घेताना हे काही ठाऊक नव्हते की, दूध व केशरसारखे प्रेम आयुष्यात येईल. दुध-केशर या युग्माच्या योजनेप्रमाणेच गंध-कळ्या, फुले-ओंजळ,

माती-बिया, मेघ-माती, चंद्र-ढग, दार-तोरण व शेवटी साजण-सखी अशा शाब्दिक युग्मांच्या योजनेतून प्रेमाचा गोडवा, अलवारता, रंग, गंध व शीतलता अशा सुंदर संवेदनानुभूतींच्या सूचक अविष्कारांतून प्रेमाची निराळी तऱ्हा वाचकांना अनुभवाला येते.

प्रेम होते तेव्हा नेमके कोणत्या मानसिक अवस्थेतून प्रेमिक प्रवास करतात, ही बाब कुतूहलाचा भाग ठरावी अशी आहे. 'आसक्तीचे आभाळ' या कवितेत या कुतूहलाला शब्दरूप देण्यात आलेले आहे. प्रियकर व प्रेयसी परस्परांशी जो संवाद करतात त्यातून परस्परांविषयीचे आकर्षण वाढत जाते. आकर्षणाचे रूपांतर आसक्तीत होते. आसक्तीतून पाहिले की, भोवतालच्या वस्तूंत होणारे बदल आनंददायी वाटू लागतात. जसे की, जमीन निरागस वाटू लागते. ती बहरताना देहाच्या सर्व इच्छा मनाला जडत असल्याचा सुखद प्रत्यय चमकदार मृदू उन्हासारखा वाटू लागतो. एकमेकांना स्पर्शही न करता होणाऱ्या भेटींतून फुललेले प्रेम दोहोंनाही हवेहवेसे वाटते. प्रेम कसे दिले याविषयीचा उत्कट अनुभव असा व्यक्त होतो. 'तुला मी मधाचे जहर पहिले दिले/ जीवाच्या फुलांचे बहर पहिले दिले/ दिली कोवळी जाग अर्ध्या कळ्यांची/ सुखाच्या ऋतूंचे गंध पहिले दिले' (निरंजन, पृ.२४) येथे 'मधाचे जहर' व 'फुलांचे बहर' अशा परस्परविरोधी वाटाव्यात अशा प्रतिमा आशयाची अपरिहार्यता म्हणून योजण्यात आलेल्या आहेत. मधाची गोडी अपार मात्र उपलब्धता अत्यल्प तसे प्रेमातील व्यक्तीला द्यावयाच्या स्नेहाचे स्वरूप असते. येथे 'जहर' हा शब्द 'मधाचे' नंतर आला आहे. 'जहर' हे विशेष्य म्हणून आले आहे व 'मधाचे' हे त्याचे गुणविशेषण आहे. विशेष्य व गुणविशेषण यांच्यात विरुध्द अर्थ दर्शविण्यात आलेला आहे. 'मध' या नामाचे नामसाधित विशेषणात रूपांतर करण्यात आलेले आहे. की जो शब्द 'जहर' विषयी अधिक माहिती सांगतो. व्यवहारभाषेत 'मधाचे जहर' असा शब्द प्रचलित नाही. फार तर मधातून जहर दिले जावू शकते. म्हणून 'मधातून जहर' हा शब्दप्रयोग आपल्या संवादातील भाषिक सवयीचा भाग आहे. शास्त्रीय भाषेतही 'मधाचे जहर' हा शब्द तार्किकदृष्ट्या वापरत नाहीत. संस्कृत साहित्यमीमांसक कुंतकाच्या दृष्टीने पाहीले तर प्रस्तुत कवितेत लौकिक भाषा व शास्त्रव्यवहारातील भाषा याहून भिन्न स्वरूपाची काव्यभाषा घडविण्यात आलेली आहे. त्यामुळे मधाचे जहर, दुःख गोडव्याने झरणे, अर्ध्या कळ्यांची कोवळी जाग, सुखाच्या ऋतूंचे पहिले गंध, नव्या भावनांची झळाळी, खुणेचे पहिले गीत अशा नवार्थबोधक प्रतिमांची योजना करण्यात आल्याने वाचकांना प्रतिभस्पर्शाने घडविलेल्या काव्यभाषेतून सुंदर अर्थाचा प्रत्यय अनुभवाला येतो.

आपल्या प्रिय व्यक्तीला थोडीही वेदना होऊ नये यासाठी कवितेतील 'मी'च्या प्रेम करण्याच्या अत्यंत हळुवारपणातही सावधपण व्यक्त होते. या सावधपणातून, अतीव प्रेमातून आपण मध दिले परंतु या मधानेही (चांगुलपणाने, गोड वागण्याने) आपल्या प्रेमिकेला त्रास तर झाला नसेल ना? ही भावना निर्माण झाल्याने मध जहर झाले असा कल्पित विश्वास वाढीस लागतो. म्हणून 'तुला मी मधाचे जहर पहिले दिले' असा भाव

व्यक्त करण्यात येतो. प्रत्यक्षात मध हे मधच आहे. त्यावर 'जहरा'च्या वैशिष्ट्यांचा आरोप केल्याने लक्षणा या शब्दशक्तीचाही येथे प्रत्यय येतो. प्रस्तुत संहितेत कायिक, नादवर्तनी व शब्दध्वन्यात्मक रूपबंधाच्या जाणिवांची योजना करण्यात आल्याने काव्यसौंदर्य निर्माण झालेले आहे.

प्रियकराच्या भेटीचे, मीलनाचे वर्णन करणाऱ्या काही काव्यसंहिता वेधक आहेत. प्रेमात असताना युवतीची फसवणूक होण्याचा धोकाही असतो. याविषयी तरुण मुलीला सावध राहण्याचा इशारा देणारा काव्याशय 'मंत्राक्षर'मधील कवितांतून घडविण्यात आलेला आहे. प्रेमिकाच्या धीट व अधीर वृत्तीमुळे प्रेमिकेने भेटीला न येण्याचे सांगूनही तो अवेळीच येवून जातो. शाब्दिक संवादाबरोबरच शरीर संवाद सहज घडून तिला झालेल्या वेदना, त्रास त्याला कळत नाही. परंतु तिच्याप्रती असलेली ओढ व प्रेमापोटी तो तिच्याशी जवळीक करतो. त्याचे प्रेम सोसणे कठीण होते तरीही त्याची आगळीक सुरूच असते. अशा अवखळ, अधीर व धीट प्रियकराची पुरुषप्रतिमा 'नको भेटूस अवेळी' या कवितेत चित्रित करण्यात आलेली आहे. स्त्री व पुरुष यांच्यातील प्रेमविषयक जाणीव वेगवेगळ्या स्वरूपाची असते. विशेषतः स्त्रीची प्रेमजाणीव भावनिक स्तरांना तोलून धरणारी तर पुरुषाची प्रेमजाणीव प्रामुख्याने शरीर आकर्षणातून निर्माण होत भावनिक स्तराला दुय्यम मानणारी असते. अपवादात्मक स्थितीत भावनिक स्तरांना तोलणारी प्रेमजाणीव काही पुरुषांतही असू शकते. परंतु प्रस्तुत कवितेतील प्रेमजाणिवेचे चित्रण समाजातील वास्तवाचे प्रातिनिधिक प्रतिबिंब आहे.

साजणाने दिलेल्या भेटवस्तूचे अप्रूप 'केशरची खूण' या कवितेत सांगण्यात आलेले आहे. साजणाने कातरवेळी येवून काकणांची भेट दिली. या भेटवस्तूने ती मोहरते. ती काकणे हातात घातली तर विचारणा होईल की तिने ती कुठून आणली? तिला कुणी दिली? काकणे तिच्याकडे आहेत ही बाब कुणाला ठाऊक नाही. तरीही काकणे हातात घालावीत की घालू नये? याविषयी मी संभ्रमित असते. तसेच 'ओटीत चंद्र माझ्या' या कवितेतून प्रियकराच्या मीलनातून मिळालेल्या सुखद अनुभूतींचे सूचक वर्णन करण्यात आलेले आहे. 'ठिपका' या कवितेत कवितेतील 'मी'ने तिला एका कोऱ्या कॅनव्हासवर चित्र रंगविण्यास सांगितले. या चित्रातून तिने स्वतःचे मन रंगवावे असे कवितेतील 'मी'ने तिला सांगितले. चित्र रंगविणारी ती अतिशय अधीरतेने रंगांचा वापर करून कॅनव्हासवर चित्र काढेल असे त्याला वाटते. परंतु तिने एक वेडावाकडा, पण कमालीचा जिवंत हिरवा ठिपका काढला आणि आणखी काहीच न काढता तिने हसून सांगितले की, 'हा तू, बाकी सारे कधीच मिटले/ एवढेच होते मनभर झालेले' (मंत्राक्षर, पृ. ६४) प्रेमानुभूतीतील पुरुषाचे चित्रण समजूतदार प्रियकर, जीवनसखा असे करण्यात आलेले आहे. तिच्या मनाचा त्याने एकेकाळी ठाव घेतला. तो ती आयुष्यभर जपते. कॅनव्हासवर मन रंगविताना हिरवा ठीपका म्हणून त्यालाच रंगविणे ही कृती विलक्षण सूचक आहे. हिरवा रंग हा समृध्दी व आनंदाचे

प्रतीक आहे. तर कॅनव्हास हा जीवनाचे प्रतीक आहे. तिच्या जीवनात त्याचे असणे हे हिरवेपण घेवून आल्याने सुखद आल्हाददायी चेतना जागविणारे आहे. तिला समृद्ध करणारे आहे. त्याचे असणेच तिच्यासाठी सर्वकाही आहे. तिच्या आयुष्यातील इतरांना अत्यंत दुय्यम स्थान असल्याने ते कॅनव्हासच्या परीघावरही नाहीत. म्हणजेच जीवनात इतर दुय्यमस्थानी आहेत. यातून प्रियकराला सर्वस्व मानण्याची भारतीय स्त्रीमनाची धारणा अत्यंत सूचकतेने चित्रित करण्यात आलेली आहे.

विरहाने व्याकूळ झालेल्या साजणीच्या मनाची घालमेल 'आले भरून स्वतःत' या कवितेत मांडण्यात आलेली आहे. त्याची भेट न झाल्याने तिचे मन अस्वस्थ आणि अधीर होते. त्यासाठी तिने हृदयाच्या आगेमागे लक्षावधी येरझारा घातल्या आहेत. दिवे लागणीच्या वेळेला घर जागे ठेवले आहे. दिवा लावून ईश्वराकडे प्रार्थना केली. देवालाही आपल्या काळजातले दुःख सांगितले की, साजणाला लवकर पाठवावे. त्याचा विरह सहन करणे कठीण झाल्यावर ती म्हणते, 'आले शब्दाशी मी पुन्हा/ आले भरून स्वतःत/ आता चाहुलीने तुझ्या/ आत होऊ दे आकांत' (मंत्राक्षर, पृ.३५) त्याने यावे आणि भेट घ्यावी यासाठी तिने भावनांच्या पातळीवर दाटून आलेले मनातील काहूर अशा प्रकारे व्यक्त केले आहे. त्याची चाहूलही लागली तरी पुरे. हा भाव तिच्या अत्यंत आवेगपूर्ण विरही मनोवस्थेचे दर्शन घडवितो. 'मुकी आठवण' या कवितेतही त्याच्या आठवणीने कासावीस झालेल्या प्रेयसीचे मन त्याच्याजवळ जावून थांबते असा आशय घडविण्यात आलेला आहे.

ईश्वराविषयीच्या प्रेमानुभूतीचे चित्रण हा अरुणा ढेरेंच्या प्रेमविषयक कवितांतील वेगळा विशेष आहे. त्यांच्या कवितांतून ईश्वराच्या भेटीची आस प्रकट होते. ईश्वराचे अस्तित्व आपल्या आसपास असल्याचे भान कविमनावर भक्तिभावाचे रोपण करते. यातून ईश्वराच्या भेटीची आर्तता व्यक्त होते.

**९. स्त्रीशोषणाचे संदर्भ :**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण करण्यात आलेले आहे. तरुण मुलीला अविश्वासाने घरात डांबून ठेवणे, अत्यंत श्रीमंत कुटुंबातील बाईलाही स्वातंत्र्य नसणे, जिवाभावाच्या गोष्टी बोलण्यासाठी मन हलके करण्यासाठी कुणीही न भेटणारी स्त्री, प्रेमभंगातून होणारे स्त्रीशोषण व खोट्या प्रेमातून झालेला बलात्कार असे स्त्रीशोषणाचे संदर्भ कवितांतून येतात.

'निरंजन' मधील 'ती' या कवितेत असलेल्या मुलीला झालेल्या प्रेमाची बित्तम बातमी तिच्या घरातील लोकांना कळते. प्रेमाला विरोध असल्याने तिला घरातच अंधाऱ्या खोलीत डांबण्यात येते. घरातील आपलीच नात्यातील माणसं परक्यासारखी वागू लागतात. तिला वाळीत टाकतात. तिच्यावर सर्व बाजूंनी नजर ठेवतात. तिच्याशी असे वागण्याने तिच्या मनावर काय परिणाम होईल याचा विचार केला जात नाही. प्रेम करणाऱ्या मुलीच्या

वाट्याला अशा प्रकारची वागणूक येते. तिच्या घरच्या माणसांकडूनच तिचे कसे शोषण होते याचे सूचक वर्णन करण्यात आलेले आहे.

'जीवापासच्या गोष्टी' या कवितेत स्त्रीला आपल्या मनातल्या जिवाभावाच्या गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत. मन हलके करण्यासाठी तशी मोकळीक तिला मिळत नाही. यामुळे तिची मुस्कटदाबी होते. तिच्यावर झालेल्या अन्यायाला ती मुकाट्याने सहन करीत राहते. प्रेमभंगाचे दुःख लपविण्यातून तिला उदासीनता, एकटेपणा येतो. मानसिक पातळीवरील तिची घालमेल व दुःख व्यक्त न करू शकण्याची हतबलता असे आशयसूत्र या कवितेत येते.

'जावे जन्माकडे'मधील 'घे स्वतःला जवळ' या कवितेत स्त्रीच्या वाट्याला दुःख कसे येत जाते याचे सूचक चित्रण करण्यात आलेले आहे. स्वतःशी साधलेल्या संवादातून न रडण्याचे व डोळे पुसून घेण्याचे आवाहन करण्यात येते. झाडाच्या एखाद्या फांदीला मधाचे पोळे लागले म्हणून तिला इतर फांद्या भाग्यवान मानतात. परंतु मध काढायला आलेले लोक जाळ पेटवून मधमाशांना तडफडवून मारतात. यावेळी मधाचे पोळे असलेली फांदीही काठीठिक्कर पडते. मधाचे पोळे असलेली जी फांदी भाग्यवान वाटत होती ती सर्वाधिक अभागी ठरते. भोवतालात ज्या स्त्रीचे जीवन इतर स्त्रियांना खूप सुखकारक दिसते. प्रत्यक्षात ती तितकी सुखी असेलच असे नाही. थोडक्यात बाईचा जन्म घेतला म्हणजे दुःख आपल्या नशिबी आलेच ही पारंपरिक जाणीव स्त्रीशोषणाबाबत प्रकट होते.

'निरंजन'मधील 'कहाणी' या कवितेत प्रेमाचा खोटा बहाणा करून तरुणीची फसवणूक करण्यात येते. तिचा प्रियकर तिच्यावर बलात्कार करतो. यामुळे उध्द्वस्त झालेल्या तरुणीची व्यथा यातून कळते. 'ससाणा' या कवितेत प्रेमभंगातूनही स्त्रीचे शोषणच होते हा भाव अत्यंत कमी शब्दांतून मांडण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ, 'एखाद्या बहिरी ससाण्यासारखी/ त्याची झडप क्रूर, आकस्मित/ नखांची पकड असह्य, आक्रमक/ आणि चोच अतितीक्ष्ण, सर्वभेदक/ ते पहा,/ तिच्या काळजाचा लचका तोडून/ प्रेम दिसेनासं झालं आहे' (मंत्राक्षर, पृ.१०५) बहिरी ससाण्याची उपमा प्रियकरासाठी योजण्यात आलेली आहे. बहिरी ससाणा हा मांसाहारी पक्षी आहे. तो इतर छोट्या पक्षांची शिकार करतो. भक्ष्याला आपल्या तीक्ष्ण नखांत पकडल्यावर सोडत नाही. भक्ष्य जिवंत असतानाच लचके तोडून खातो. यावरून त्याची क्रूरता लक्षात येईल. प्रियकरही असाच तिच्या काळजाचा लचका तोडून जातो. म्हणजे जिवंतपणीच मृत्यूसमान वाटावी अशी वेदना देवून जातो. यावरून पुरुषांचा प्रेमाकडे पाहण्याचा कठोर दृष्टिकोन कळतो. प्रेमातूनही स्त्रीचे शोषण केले जाते. हा काव्याशय येथे घडविण्यात आलेला आहे.

**१०. सामाजिक चित्रण:**

ढेरेंच्या कवितांत प्रामुख्याने स्त्रीजीवनाचे चित्रण करण्यात आलेले आहे. स्त्रियांच्या भावविश्वात उठणारी आंदोलने, स्त्रियांच्या कुचंबणेची, एकाकीपणाची, उदासीनतेची कारणे

सामाजिक पर्यावरणात आढळून येतात. अनिष्ट रूढींमुळेही स्त्रियांचे शोषण होते. स्त्री व पुरुष हे समाजातील दोन प्रमुख घटक आहेत. सामाजिक व्यवस्थेत पुरुषांचे वर्चस्व असल्याने राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या पुरुषांनी विकसित केलेल्या मूल्यव्यवस्थेप्रमाणे सामाजिक व्यवहार पार पडतात. समाजातील रूढीसुध्दा याच व्यवस्थेचा भाग आहेत. अशा रूढीचे संवहन करताना समाज सोयिस्कर भूमिका घेतो. समाजातील अशा दोन रूढींचे संदर्भ ढेरेंच्या कवितांत आलेले आहेत. एक म्हणजे 'मुरळी' प्रथा होय. जेजुरीच्या खंडोबाला नवस केल्यानंतर अपत्य झाले तर देवाला वाहण्याच्या रूढीतून मुरळी प्रथा निर्माण झाली. नेणत्या वयातील कोवळ्या मुलीचे देवाशी म्हणजे खंडोबाशी लग्न लावून दिले जाते. त्यानंतर संपूर्ण आयुष्यभर तिने खंडोबाची सेवा करणे, देवाची स्तुती करणारी गीते गावून नृत्य करणे तिला बंधनकारक होऊन जाते. सर्वप्रथम ती कुटुंबापासून विलग होते. स्नेह, प्रेम व नात्यांना पारखी होते. नंतर जेव्हा वयात येते शोषणव्यवस्थेची बळी ठरते. एखाद्या स्त्रीला जाणत्या वयात असे करावयास सांगितले तर ती कदापी तयार होणार नाही. म्हणून नेणत्या वयात अशा मुलींना मुरळी म्हणून देवाला वाहण्यात येते. तिचे सर्वस्व तिने खंडोबाला अर्पण करावे, अशा प्रकारचे संस्कार तिच्या मनावर बिंबवले जातात. खंडोबाच्या बाणू व म्हाळसाप्रमाणे मुरळी ही खंडोबाला आपले सर्वस्व मानू लागते. तिच्या मनातील आर्त भाव अशा प्रकारे व्यक्त होतो. 'तुझ्या नावानं बाईपण सोडले/ अन् जीवाचा भंडारा फुकते/ देह टाकून मुरळी नाचते' (निळ्या पारदर्शक अंधारात, पृ. ४८) एका स्त्रीच्या वाट्याला आलेला हा भोगवटा सांस्कृतिक परंपरेतून निर्माण झालेला आहे.

दुसऱ्या एका विशिष्ट रूढीचा संदर्भ 'संध्येच्या श्यामल प्रवाहावर' या कवितेत येतो. एका गावात जलदेवतांना प्रसन्न करून घेऊन लहानग्या बाळाला दीर्घायुष्य लाभण्यासाठी एक टोपलीत घालून वाहत्या पाण्यात सोडले जाते. नदी पात्राच्या एका बाजूने टोपलीत घालून पाण्यात सोडलेले बाळ दुसऱ्या बाजूने त्याच्या आईकडे सुखरूप वाहत येते. अशा बाळाला जलदेवतांचा आशीर्वाद मिळाल्याने त्याचे भविष्य उज्ज्वल बनते, असा गावकऱ्यांचा दृढ विश्वास असल्याने वर्षानुवर्षे ही परंपरा चालत आलेली आहे. अशा अनिष्ट रूढीचे पालन करताना नदीच्या वाहत्या प्रवाहात लहानग्या जीवाला काही कमी अधिक झाले तर? तसेच ज्या आईचे ते लहानगे बाळ वाहत्या पाण्यात टोपलीत घालून असे एकटेच सोडले जाते त्यावेळी त्याच्या आईची मानसिक अवस्था कशी असेल? यासारख्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते. अशी वैचारिकता प्रस्तुत कवितेतून व्यक्त करण्यात आलेली आहे.

'पोरी जपून ये' या कवितेत तरुण मुलीशी संवाद करण्यात आलेला आहे. पूर्वार्धात 'पोरी जपून ये' या संबोधनातील 'पोरी' या शब्दातून तिच्या अनअनुभवीपणाचा भाव व्यक्त होतो. पोरीने नेणत्या वयातील निरागस आनंदी जीवन जगून घ्यावे. तिला हवे तसे सुखकारक क्षण तिने आपलेसे करावे. एकदा ती वयात आली की, मग पोरीचे रूपांतर

'बाई'त होते. 'हे करू नको', 'ते करू नको','तू आता मोठी झालीस' अशा अनेक सूचनांतून तिला तिच्या पारतंत्र्याची जाणीव हळूहळू करून देण्यात येते. 'जपून' वागण्याचा संस्कार स्त्रीच्या बालपणापासूनच तिच्या मनावर खोलवर रूजवला जातो. त्यामुळे तडजोड करून घेण्याची वृत्ती व सुरक्षितपणे वावरण्याची सवय तिला अंगभूत होत जाते. या गोष्टी स्त्रीला ज्या पध्दतीने कुटुंबात शिकविल्या जातात त्याच पध्दतीने पुरुषांना असे संस्कार केले जात नाहीत. त्यामुळे स्त्रियांच्या तुलनेने पुरुष अधिक स्वतंत्र व हिंसक मनोवृत्तीचे बनतात हा स्त्री-पुरुषांतील भेद अधिक ठळकपणे जाणवतो. स्त्रीने आपल्या उज्वल व दमदार भविष्याचे स्वप्न रंगवावे यासाठी केलेले हे आवाहन व सावध राहण्याचा इशारा पहा. 'ये/ आत्ता वाह पहा/ भरल्या देहाच्या वळणावर,/ दुखवणाऱ्या, घुसळणाऱ्या, चिरडणाऱ्या काळाची/ भयकारी अवजड पावलं/ तुझ्याकडे वळण्यापूर्वी/ तुझ्या अबलख स्वप्नांवर स्वार होऊन येणाऱ्या/ सतेज, दमदार भविष्याची/ ये/ बाई, जपून ये' (जावे जन्माकडे, पृ.८१)

समकाळात स्त्रियांवरील हल्ले, अत्याचारांत वाढ झालेली आहे. म्हणून हा काळ स्त्रीला दुखावणारा, चिरडणारा असल्याचा इशारा वयात आलेल्या पोरीला देण्यात येतो. स्त्रीचे संरक्षण करणारी व्यवस्थाही दुबळी ठरत असल्याचे यावरून लक्षात येते. शेवटच्या ओळीतील 'ये' मग 'बाई' जपून ये हे वाक्य 'पोरीचे' बाईत रूपातर झाले तरी 'बाई' झाल्यानंतरही आपण सावध व सुरक्षित राहावे हा अर्थभाव स्त्रियांच्या अबोध मनातील भितीचेच प्रातिनिधिक रूप होय. बाईने जपून वागत राहणे सुरू ठेवले तरी सार्वजनिक जीवनात तिच्या वाट्याला वाईट अनुभव येणारच नाहीत असे नव्हे. किंबहुना असे अनुभव स्त्रियांना समाजात वावरताना येतच असतात. 'कांडता कुटताना' या कवितेत एकटी स्त्री जेव्हा सार्वजनिक ठिकाणाहून चालत जाते त्यावेळी तिला आलेल्या वाईट अनुभवाचे चित्रण करण्यात आलेले आहे. रस्त्याच्या कडेला अनेक पुरुष एकत्रित जमलेले असतात. काही कामधंदा करण्याऐवजी ते अशा एखाद्या चांगल्या घरातील बाईला शेजारून जाताना पाहून आक्षेपार्ह शेरेबाजी करतात. तेथून जाणाऱ्या या गरत्या स्त्रीला हा असा अश्लील शेरेबाजीचा अनुभव नवीन असतो. हे लोक आपल्याशी असे वागतील याचा तिला अंदाज नसतो. ती एकटी असते आणि ते बहुसंख्य असतात. त्यांनी अमुक असे वाईट बोलले म्हणून तिने आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला तर ते बहुसंख्य असल्याने तिला खोटे ठरविले जाण्याची शक्यता अधिक असते. म्हणून ती झाला प्रकार मनातच ठेवून डोळ्यांतील पाणी पुसत आब राखून तेथून झर्कन निघून जाणे पसंत करते. तिच्यावर ओढवलेली ही आपबिती तिने कुणालाही सांगितलेली नसते म्हणून कधीही कुणालाही ही गोष्ट कळलेली नसते. याविषयीचे निरीक्षण नोंदविणाऱ्या या ओळी पहा. 'कांडता कुटताना हातावरच बसावा मुसळाचा घाव/ तसा कधीकधी अकस्मात,/ घाव बसतो स्त्रीत्वाचा तिच्यावरही' (जावे जन्माकडे, पृ. ७१) स्त्रीच्या स्त्रीत्वामुळे हे झाले. ती बाई नसती तर ते पुरुष असे

काही बोललेच नसते. स्त्रिया असेच मानून चालतात.

तरुण मुलीच्या अचानक गर्भार होण्याने निर्माण झालेल्या प्रश्नाकडेही समाजात एका वेगळ्या दृष्टीने पाहिले जाते. 'रूजवण' या कवितेत अशा तरुणीच्या मनाची घालमेल वर्णन करण्यात आलेली आहे. 'पदर बांधून रोजच्या रोज' या कवितेत पारंपरिक पध्दतीने झालेल्या विवाहातून कुचंबणा अनुभवणाऱ्या स्त्रियांचे दुःख प्रातिनिधिक स्वरूपात चित्रित करण्यात आलेले आहे. लग्न जमताना मनातून पसंत नसलेल्या व्यक्तीसोबत विवाह लावून देण्यात येतो. बहुदा मुलीचा होकार गृहीत धरला जात असे. कुटुंबातील सदस्यांनी संबंध जुळविण्यासाठीची सर्व बोलणी करून घेतल्यानंतर औपचारिकता म्हणून नवऱ्या मुलीला पसंतीबाबत विचारले जाते. तिने दिलेल्या होकाराला नकाराची लकेर असते. मात्र त्याकडे साफ दुर्लक्ष केले जाते. आपल्या घराण्याची इज्जत शाबूत राखण्यासाठी तोंडातून 'ब्र'ही न काढता अनेक दुःखांना सामोरे जाणाऱ्या मुलींचे जगणे संघर्षाचे असते हे वास्तव कवितेतून मांडण्यात आलेले आहे.

सामाजिक बदलांचे चित्रण ढेरेंच्या कवितांत करण्यात आलेले आहे. ग्रामीण भागात एका गावाचा विकास होताना त्याच्या मूळ स्वरूपात जे बदल होतात ते गावाच्या गावपणाला नष्ट करणारे असल्याची जाणीव 'गावाचा कायापालट' या कवितेतून व्यक्त करण्यात आलेली आहे. विकासाच्या नावाखाली गावात झालेली वृक्षतोड गावाचे नैसर्गिक सौंदर्य घालविणारी ठरते. गावातील रस्ते व इमारती सिमेंटच्या बांधण्यात आल्याने गावाचे भौतिक रूप पालटले. लोकांच्या राहणीमानाच्या बदलाबरोबरच वैचारिक पातळीवर झालेले बदल गावाची जुनी निरागस ओळख पुसून नवी आधुनिकवादी स्वार्थी ओळख बनवत आहे.

अरुणा ढेरेंच्या कवितांतून जे सामाजिक चित्रण करण्यात आलेले आहे त्यात स्त्रियांप्रती करूणा, सहानुभूती व प्रेमभाव व्यक्त होतो. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला सामाजिक रूढी जबाबदार असून स्त्रियांवरील अत्याचार पुरुषांच्या हिंसक मनोवृत्तीमुळे होतात, असे म्हणता येते.

**११.समकालीनता :**

समकालीनता या शब्दप्रयोगातून काळाविषयीची कल्पना येते. काळाची विशिष्टता सूचित करणारे विशेष, मूल्ये लक्षात घ्यावी लागतात. काळविशेषांचा व मूल्यांचा प्रभाव समाजातील इतर घटकांवर होतो त्याप्रमाणे कवी व कविता यांवरही होतो. अरुणा ढेरेंच्या कवितांत गेल्या चार दशकांतील कालभानाचे संदर्भ येतात. कवयित्रीचे काव्यव्यक्तिमत्त्व हे व्यापक भारतीय परंपरेच्या प्रभावांनी समृध्द झालेले असल्याने आपल्याला मिळालेले सांस्कृतिक संचित वाचकांच्या पुढ्यात ठेवण्याचा प्रयत्न म्हणून त्यांच्या काव्यनिर्मितीकडे पाहावे लागते.

विशेषतः सन १९९० नंतर बदललेली आर्थिक धोरणे, राजकीय सत्तांतरे, शिक्षणाचा वाढता प्रसार, वाढते औद्योगिककरण व शहराची वाढती सूज, पाश्चात्य संस्कृतीविषयी

भारतीयांना असलेले अप्रूप बदलत्या जीवनशैलीत रुजू लागले. अशा अनेक घटकांच्या बदलत्या शैलीने सामाजिक जीवनात घुसळण घडवून आणली. याचा सर्वाधिक परिणाम स्त्रियांच्या जीवनावर झाला. स्त्रियांचा शिक्षणाचा टक्का वाढला. स्त्रिया नोकरी करू लागल्या, मात्र बदलत्या परिस्थितीत त्यांच्यापुढे नवीन आव्हाने उभी राहिली. स्त्रियांवरील अत्याचारांत वाढ झाली. हा वाढता मूल्यऱ्हास पाहून संवेदनक्षम कविमनही वैतागते. आपला श्वासच गुदमरून गेल्याची भावना व्यक्त करण्यात येते. आपल्या काळातील मूल्यऱ्हासाविषयी असे भाष्य करण्यात येते. 'अधांतरी होतात हाका,/ काळोख दडपतो प्रार्थनेचा दुबळा प्रयास/ सर्वभर घुमत राहतो/ मूल्यांच्या कण्हण्याचा ओलसर आवाज' (निरंजन, पृ.७०)

शब्दप्रामाण्य, टिकाऊपणाला महत्त्व, नैतिकतेला सर्वोच्च स्थान यासारख्या गोष्टींनी जडणघडण झालेल्या मनाला नवे बदल रूचणे कठीण होते. सकारात्मक जीवन जगणाऱ्यांपुढे या काळाने नवे आव्हान उभे केले आहे. चांगल्या गोष्टीसाठी केलेली प्रार्थना निष्फळ ठरते. मूल्यांच्या कण्हण्याचा ओलसर आवाज ऐकू येणे ही नवीन प्रतिमा व्यापक अर्थाचा निर्देश करते. माणसांना आपल्या नातेसंबंधांविषयी असलेली आस्था संपुष्टात येत असल्याचे नवे कालभान 'काय होते' या कवितेतून व्यक्त करण्यात आलेले आहे. नात्यांना अतिव महत्त्व दिल्यामुळे कुटुंबातील घटकांचे परस्परांविषयी प्रेम, स्नेह, ऋणानुबंध दृढ राहतात. ऋणानुबंध टिकविण्याचे संस्कार कुटुंबात झाल्यामुळे सामाजिक पातळीवरील नात्यांतही अशीच आत्मीयता रूजते. यामुळे निकोप व निरोगी सामाजिक वातावरण राहायला मदत होते. परंतु समकाळात स्वार्थी मनोवृत्ती वाढीस लागल्यामुळे नात्यांना दुय्यम महत्त्व देण्यात येते. पैसाकेंद्री जीवनशैलीमुळे माणसे माणूसपणाला पारखी होत आहेत. मनात सद्भावना व शुभेच्छांचे खरेच काय होते? असा प्रश्न संवेदनक्षम कविमन विचारते.

'तत्कालीकता' व 'वापरा आणि फेका' ही नवीन तत्त्वे जीवनाच्या केंद्रस्थानी आल्याने आधिची भक्कम मूल्यव्यवस्था दोलायमान झाली आहे. या स्थितीला कवितेतून 'प्रदूषण' असे संबोधण्यात आले आहे. मानवी वर्तनातील निरागसता कमी होत चालली आहे. निरपेक्षता हरवत चालली आहे. माणसांतील मत्सराचा प्रमाण वाढीस लागले आहे. अशा या बदलत्या पर्यावरणात संवेदनक्षम व्यक्तीची स्थिती अशी होते. 'आपण रडावे आतल्या आत/ मनस्तापाने कळवळून जावे/ अन् ओंजळीत चेहरा लपवताना/ एकाएकी ध्यानी यावे/ की चढली आहे एक कृत्रिम त्वचा/ आपल्याही मूळ त्वचेवर/ आणि रक्तात भिनलेले उदास दुबळेपणाचे तीव्र जहर' (निरंजन, पृ. ३६)

आपल्याला ऐंद्रिय संवेदनाची जाणीव ज्याद्वारे होते त्या पंचज्ञानेंद्रियांपैकी एक म्हणजे त्वचा होय. त्वचेची संवेदना नसलेली व्यक्ती एक तर बेशुध्द असते किंवा दुर्धर आजाराने ग्रस्त असते. बाजारू मूल्यव्यवस्थेने माणसांना निबरपण आणले आहे. संवेदनक्षम

मन या बदलत्या घटितांनी हतबल होते. त्यामुळे मनाला आलेल्या उदासीनतेची तीव्रता 'दुबळेपणाचे तीव्र जहर' या प्रतिमेच्या योजनेतून दर्शविण्यात आलेली आहे. हवेप्रमाणेच लोकांची बुध्दीही काळवंडू लागली आहे. तात्पुरत्या सुखाच्या गोष्टी शोधून त्यात रमण्याची वृत्ती, हरेक क्षेत्रात घुसलेली अनाठायी स्पर्धा यामुळे सर्वत्र असमंजसपणाचा कोलाहल माजल्याची अनुभूती कवितेतून सूचकतेने व्यक्त करण्यात आलेली आहे. समकाळात या बदलत्या परिस्थितीविषयी उपस्थिती करण्यात आलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. उदाहरणार्थ, 'विवेकाला कुणी, कसे जपायचे?/ कसे मोकळे व्हायचे विषारी वातावरणातून,/ कसे हसायचे निरामय/ कसे जन्म द्यायचे निष्पाप गाण्यांना/ आणि द्यायचे कसे त्यांना / या प्रदूषित जीवनापासून अभय?' (निरंजन, पृ.३६)

माणसांनी समाजाच्या संतुलित संवहनासाठी विवेकाने जगणे ही कोणत्याही समाज-संस्कृतीच्या हिताची अपरिहार्य बाब होय. विवेक हरवलेला समाज स्वतःच्याच अधःपतनाकडे वाटचाल करीत आहे. भ्रष्ट व्यवस्था, सामाजिक विषमता, माणसांची वाढती हिंस्र प्रवृत्ती आपले सांस्कृतिक पर्यावरण प्रदूषित करीत आहे. अशा स्थितीत गोंधळून गेलेल्या कविमनाला आपली कविता कशी जपावी? कवितेतून मांडले जात असलेले सत्य-शिव-सुंदराचे दर्शन कसे घडविता येईल. किंबहुना समकाळात कवितेला या प्रदूषित वातावरणापासून कसे अभय द्यावे? हा प्रश्न सतावतो. समकाळात बदललेली महानगरे हासुध्दा कवितेचा महत्त्वाचा विषय झालेला आहे. अरुणा ढेरेंच्या 'आता काय होईल' या कवितेत महानगराशी जुळवून घेवू न शकलेल्या 'मी'चे कथन आलेले आहे. ती एकेकाळी धावत येऊन विसावते. महानगरात उठणारे धुराचे तीव्र काळे लोट तिला सोसवेनासे होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून येणारा वास तिला मृत्यूच्या वासाप्रमाणे वाटतो. महानगरात तत्वनिष्ठेने वागणाऱ्या माणसांची कोंडी केली जाते व निष्ठेने काम करणाऱ्यांचे आवाज दाबून त्यांना भयभीत केले जाते. कामाच्या ठिकाणी, रस्त्यावरही माणसं माणसांशी प्रेमाने वागण्याऐवजी एकमेकांचा द्वेष-मत्सर करीत वागतात. यामुळे विवेकाने वागणाऱ्या माणसाला अगतिक केले जाते. अशा भयंकर वातावरणाने घाबरलेली संवेदनक्षम 'मी' म्हणते, 'भयचकित थांबले आहे मी/ इथे शहराच्या आ वासलेल्या तोंडाशी/ माझे तर तळपाय अजून ओले ओले/ मी तिथून भटकत आले पाऊलवाटांनी हिरव्यागार/ तिथल्या रानगावताने तरतरलेले/ केसांवर अजून सांडले आहेत पराग जर्द पिवळे/ आणि हात नव्या किणकिणत्या बांगड्या भरलेले / आता काय होईल?/ खरेच, आता काय होईल?' (निरंजन, पृ.३७) खेड्याशी नाळ जुळलेली असलेल्या स्त्रीला शहरातील वातावरणाशी जुळवून घेणे कठीण होते. अशा परिस्थितीत तिला पडलेले प्रश्न महानगरात हरवलेल्या माणूसपणाचे निदर्शक ठरतात.

'मंत्राक्षर'मधील कवितांतून समकालीन सामाजिक व औद्योगिक घटितांच्या

परिणामांचे चित्रण करण्यात आलेले आहे. औद्योगिकीकरणामुळे कारखान्यांचे टाकाऊ सांडपाणी गावाच्या नदीत सोडण्यात येते. कारखान्याच्या पाण्याने नदीतील विषारी द्रव्यांचे प्रमाण वाढत जाते. नदीच्या काठाने वसलेले पूर्ण गावच प्रदूषणाला कंटाळून विस्थापित होते. याचे वास्तव चित्रण 'ओळखीच्या पार पलीकडे' या कवितेत करण्यात आलेले आहे. तसेच 'उच्छाद' या कवितेत वाघाच्या हल्ल्याने मृत्यू येण्याचे भय पांघरून असलेल्या खेडूतांचे दुःख मांडण्यात आलेले आहे. भयाची तीव्रता किती गडद आहे, हे कवितेच्या लयबद्धतेतून सूचित होते.

समकाळात माणसाला आलेले एकाकीपण त्याचा मानसिक कमकुवतपणा वाढविणारे ठरते. अशा स्थितीत दुखावलेले हृदय, फुटून वाहणारे भय व कुणाही हाकेला साद देणारे नसताना काळकोळी जणू काही विष फेकतोय. अशी भावना 'अदय' या कवितेतून व्यक्त करण्यात आलेली आहे. काळ अविनाशी आहे. परंतु तो सर्जनशील निर्मिती करणाऱ्या मनाला हरवू शकत नाही. किंबहुना अनिष्ट गोष्टीचे संसूचन करणारा काळ आपल्यापुढे मरून पडलेला आहे. ही कल्पना अशा रीतीने व्यक्त होते. 'मी एकटी/ बंद/ आणि शेजारी मरून पडलेला काळ/ अरे कुणी या/ आणि या मेलेल्याला उचलून न्या/ मी जिवंत आहे/ अजून' (निळ्या पारदर्शक अंधारात, पृ.२३) समकाळातील अनेक वाईट गोष्टींमुळे हा काळ बदनाम झाला असून याला काही अस्तित्व उरले नाही. किंबहुना तो सर्जनशील व्यक्तित्वापुढे मृत झालाय. ही सकारात्मक वृत्ती आपल्या काळाला नवीन दिशा देण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावेल असा विश्वास वाटतो. ढेरेंच्या कवितांतून व्यक्त झालेला लढाऊ वृत्तीचा विवेक समकालीनतेच्या संदर्भातील सारतत्त्व होय.

**१२. व्यापकता:**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून व्यक्त झालेल्या जीवनजाणिवा व्यापक जीवनदृष्टिकोन अभिव्यक्त करणाऱ्या आहेत. मानवाचे आदिम रूप, त्यावेळची त्याची मनोवस्था ते समकालीन मानवी व्यक्तिमत्वे, पशु-पक्षी व झाडांप्रती असलेला दयाभाव, स्त्रियांच्या दुःखाची अपरिमितता, पर्यावरणीय भान, रक्ताशिवायच्या नात्याची महती अशा अनेक विशेषांतून व्यापक जीवनानुभूतींचा प्रत्यय येतो.

'शिल्लक' या कवितेत स्त्री व पुरुष यांच्यातील नात्याच्या हजारो वर्षांच्या इतिहासाचे संदर्भ आलेले आहेत. आदिम काळातील स्त्री-पुरुषांतील रांगड्या रतीभावाचे, नैसर्गिक वृत्ती, प्रवृत्तींचे सूचक चित्रण करण्यात आलेले आहे. गेल्या हजारो वर्षांच्या इतिहासात पुरुषांचा अहंभाव विकसित होत गेला. या अहंभावाची जोपासना करण्यापूर्वी मातृसत्ताक कुटुंबपध्दती सोयिस्करपणे संपविण्यात आली. स्त्रीला आपले सर्वस्व पुरुषाप्रती अर्पण करण्याची सवय लावण्यात आली. स्त्री-पुरुषांच्या सनातन नात्यात स्त्रीनेच तडजोड स्वीकारली. ती दयाळू बनत गेली. मातृसत्ताक कुटुंबपध्दतीने तिला बहाल केलेले हक्क,

अधिकार सोडून देण्याची वेळ तिच्यावर आली. पुरुषप्रधान व्यवस्थेने तयार केलेले कायदेकानून तिच्या हक्कांवर गदा आणणारे ठरले. त्यात तिच्या शोषणाची व्यवस्था सोयिस्करपणे लावण्यात आली. हजारो वर्षांच्या इतिहासात देवतांनीही स्त्रीला पीडाच दिली. तिच्या मनावर ओरखडे ओढण्यात आले. जुन्या सांत्वनाच्या खुणा ती अंगोपांगी वागवत आली. स्त्री व पुरुष यांच्या सामाजिक स्थानावर भाष्य करणाऱ्या या ओळी पहा. 'सावकाश कळते तिला/ शिल्लक उरल्या इथवर आजपर्यंत/ तिच्या-त्याच्या सनातन नात्यामधल्या/ फक्त दोनच गोष्टी-/ एक त्याच्यापाशी त्याचा अहंभाव संपूर्ण, देखणा/ आणि एक तिच्यापाशी डाव्या मांडीवरचा सर्वस्वशरण तीळ/ चिमणा, केविलवाणा' (जावे जन्माकडे, पृ.७०)

समकालीन समाजव्यवस्थेत पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले आहे. पुरुष स्त्रीहून अधिक उजवा, सक्षम व बुध्दिमान असल्याचा समज तो पुरुषाने करून घेतला आहे. त्यातून त्याचा अहंभाव रूजलेला आहे. पुरुषांच्या या अहंभावाची जोपासना सामाजिक रूढी-परंपरांतून करण्यात आली. त्याच्या श्रेष्ठत्वाची महती स्त्री मनावर अशा रीतीने बिंबविण्यात आली की, तिनेही पुरुषाचे अहंकारी वर्चस्व स्वीकारले. हा अहंभाव देखणा करण्यात आला. या विधानातून उपरोध व्यक्त करण्यात आलेला आहे.

'देवी' या कवितेतून देवीला बायकांच्या भाबडेपणाची, निष्ठेची कणव येते. घरदारासाठी आपल्या हाडांची काडे करणाऱ्या बायकांनीच संस्कृतीला टेकू दिला. मानवी विकासाची जी अनेक युगे सांगितली जातात ती बायकांमुळेच प्रत्यक्षात आली. अशा बायकांनी देवीला केलेले नमस्कार स्वीकारणे देवीला अवघड जाते. त्यांनी केलेल्या नवसांची आर्जवे सोसणे कठीण होते. अमरत्व प्राप्त झालेल्या देवीला बायकांच्या दुःखाचे अश्रू पुसण्याचे धैर्य उरत नाही. स्त्रियांच्या सोशिक वृत्तीकडे पाहून देवीसुध्दा प्रभावित होते. या कल्पित घटिताच्या योजनेतून स्त्रियांच्या दुःखाची, वेदनामय जीवनाची व्याप्ती दर्शविण्यात आली आहे.

अन्याय सहन करून वेदना, पिडा पचवून स्त्रियांना आनंदी मनोवृत्तीने वावरण्याची सवय असते. एकमेंकींच्या व्यथा कळत असल्याने आपण एकमेकींना कधीही अनोळखी नसतो. कारण हरेक स्त्रीची व्यथा कमी-अधिक फरकाने सारखीच. बाईपणाच्या जबाबदारीला निभावताना लागणाऱ्या ठेचा, येणारे कटू अनुभव, मान-अपमान यात फरक नसतो. या अर्थाने एका बाईला दुसरी बाई ही परिचितच असते. बालपणीची निरागसता, उत्कट आनंदी वृत्ती व निर्भयत्व असलेली नजर जिच्यात आकाशाचा वेध घेण्याची चमक होती तिला कायमची जमिनीत गाडून टाकण्यात येते. हे कृत्य करणारे लोक तिचेच प्रियजन असतात. मुलींची स्वप्ने बालपणीच दडपून टाकली जातात. हा अनुभवही अनेकींचा एक सारखाच असतो. विवाहानंतर स्त्री नांदायला जाते व प्रचलित समजुतीला फाटा देणारे

कथन 'आपण नांदवतो आपला पुरुष त्याच्या चमकदार खुरा शिंगांसकट' अशा रितीने करण्यात आलेले आहे. यातून पुरुषाची प्रतिमा उद्दाम मारक्या बैलासारखी रंगविलेली आहे. मारका बैल हल्ला करण्यापूर्वी खुरांनी माती उकरतो, डरकाळतो व टोकदार शिंगांनी समोरच्याला हुंदडतो. त्याप्रमाणे आपला पतीही आक्रमक आणि जीवघेणे शाब्दिक हल्ले करतो. कधी मारतोही. परंतु काळजाला पडलेल्या भेगा लिंपून स्त्रिया संसार निभावतात. अनेक वाईट अनुभव वाट्याला येवूनही त्याविषयी चकार शब्द काढत नाहीत. अशा गोष्टी रहस्य म्हणून पोटातच ठेवतात. आपल्या हास्यातून हे जग आपण पेटवून देवू शकतो परंतु असे विचार स्त्रिया मनात आणत नाही. अशा प्रकारचा काव्याशय 'ओळख' या कवितेत घडविण्यात आलेला आहे. प्रस्तुत आशयातून स्त्रियांची उदार दृष्टी व क्षमाशील भावाचे उत्कट दर्शन घडते. स्वतःवरील अन्यायामुळे स्त्री चिडून उठते मात्र नात्यांच्या पातळीवर इतरांना नुकसान पोहचू नये हा तिच्यातील दयाभाव तिला वैशिष्ट्यपूर्ण बनवतो.

'निळ्या पारदर्शक अंधारात' मधील 'श्रीफळ' या कवितेत रक्ताचे नाते नसलेल्या व्यक्तीच्या निःस्वार्थ प्रेमाची महती वर्णन केलेली आहे. या नात्यासाठी श्रीफळाची प्रतिमा योजण्यात आलेली आहे. ज्याप्रमाणे श्रीफळ हे दुसऱ्यासाठी व शुभकार्यासाठी नेहमीच समर्पित असते, तशी एखादी व्यक्ती रक्ताच्या नात्याची नसूनही अनपेक्षित स्नेह व प्रेमाची पखरण करते. तेव्हा आपण विस्मयचकित होतो. नातेसंबंधांतून सामाजिक ऐक्य वाढीस लागते. परस्परांविषयीचा जिव्हाळा जगण्याला बळ देत असतो. आपलेपणाच्या रक्ताच्या नात्याचा शिक्का नसलेली व्यक्ती जेव्हा माणुसकी व सहृदतेची अनुभूती देते. तेव्हा निःस्वार्थ प्रेमानुभवाचा प्रत्यय येतो. असाच सुखद प्रत्यय देणारी व्यक्ती जगण्याचे अवघडपण पेलण्याचे बळ देणारी असते. हा विचार प्रस्तुत संहितेत मांडण्यात आलेला आहे.

'मंत्राक्षर' संग्रहातील 'नवे निराळे होण्यासाठी' व 'जावे जन्माकडे' मधील 'माझ्या मनात खोल तळाशी' या दोन कवितांतून पर्यावरणाविषयीचे डोळस भान व्यक्त झालेले आहे. माणसाने आपल्या सुखोपभोगी जीवनासाठी अपरिमित जंगलतोड केली आहे. थोड्या-बहुत उरलेल्या जंगलांतील पशु-पक्ष्यांची शिकार करून त्यांच्या अवयवांची तस्करी करण्यात येते. यामागे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाली करणारे दलाल व त्यांचे सहकारी सक्रिय असतात. दुर्मीळ होत चाललेल्या पशु व पक्ष्यांची शिकार याविषयीची चिंता कवितेतून व्यक्त करण्यात आलेली आहे. प्राणिमात्रांप्रती दयाभाव ही व्यापक जीवनजाणीव हे अरुणा ढेरेंच्या कवितेचे खास वैशिष्ट्य आहे.

दयाभाव हे थोर जीवनमूल्य 'पुरुष असण्याचा प्रारंभकाळ' या कवितेचे आशयसूत्र म्हणून येते. जन्मतः माणूस निरागस असतो. त्याच्या जडणघडणीमुळे तो हिंस्त्र बनत जातो. कवयित्री माणसाच्या जन्मजात दयामय माणूसपणाकडे लक्ष वेधू इच्छिते. कवयित्रींची

मानवी जीवनाकडे पाहण्याची ही अनोळखी व्यापक दृष्टी माणसाच्या पौरुषत्वाला नवीन सात्त्विक दिशा देवू शकते. यज्ञसंस्कृती ते आजवरच्या प्रदीर्घ मानवी इतिहासात शब्दांच्या आधारानेच मानवी जीवनव्यवहार सुरळीत पार पडले. शब्द हे एकेकाळी मंत्रोच्चाराचा भाग होते. शब्द वर्तमानात भाषाभिव्यक्तीबरोबरच हिंसा पसरविण्याचे माध्यम झालेत. जीवन सुखकारक होण्यासाठी बनलेली मंत्राक्षरे आज दुःखाचे कारण ठरत आहेत. समजूतदारपणा दाखविण्याच्या अभावामुळे माणूसच माणसाचा शत्रू बनलेला आहे. असे वैचारिक भान प्रस्तुत कवितांतून व्यक्त झालेले आहे.

क्षमाशील व समर्पणवृत्ती, अहिंसात्मक प्रेमभाव, नात्यांना द्यावयाचे सर्वोच्च स्थान, प्राणिमात्रांप्रती दयाभाव, शब्दभान यासारख्या जीवनतत्त्वांचा अंगिकार माणसाने केला तर मानवी जीवन सुखकर होईल, ही ढेरेंच्या कवितेतील वैचारिकता व्यापक जीवनदृष्टीचे निदर्शक आहे.

**१३. अभिव्यक्ती विशिष्टताः**

अरुणा ढेरेंच्या कवितांतील आशयाच्या उलगडा करताना अनेक ठिकाणी रूपविशेषांविषयी भाष्य करण्यात आले आहे. आशयाने सूक्ष्मातिसूक्ष्म पदर उलगडत असताना अभिव्यक्ती विशेषांची वैशिष्ट्यपूर्णताही नमूद केलेली आहे. लौकिक भाषा व शास्त्र भाषाव्यवहाराहून वेगळी काव्यभाषा कवयित्रीने घडवलेली आहे. सूचकता व नादरूपतेचा प्रत्यय देणाऱ्या अनेक संहिता ढेरेंनी घडविलेल्या आहेत. त्यांनी लिहिलेल्या बहुतांश कविता मुक्तछंदात आहेत. याशिवाय त्यांनी अष्टाक्षरी छंदात लिहिलेल्या कविताही वेधक आहेत. त्यांच्या कवितांतून शब्दखेळ, शब्दावृत्ती, संवादात्मकता, लोकलयींचे उपयोजन करण्यात आलेले आहे. त्यांच्या कवितांत विपुल प्रतिमासृष्टी अनुभवाला येते. प्रतिमांच्या विपुलतेप्रमाणेच वैविध्यपूर्णताही वेधक आहे. त्यांच्या कवितांतील प्रतिमांचे वर्गीकरण निसर्गसंबध्द प्रतिमा, आत्मनिष्ठेतून उद्भवलेल्या प्रतिमा, पारंपरिक स्त्रीत्वाचे दर्शन घडविणाऱ्या प्रतिमा, वेदनांकित जाणिवांचे दिग्दर्शन करणाऱ्या प्रतिमा, समकालीन वास्तवदर्शी प्रतिमा, रोमँटिक जाणिवांचे चित्रण करणाऱ्या प्रतिमा, शब्दनिष्ठ प्रतिमा व 'मी'च्या अलौकिक जीवनानुभूतीचे रम्य दर्शन घडविणाऱ्या प्रतिमा आदी प्रकारे करता येते.

**निसर्गसंबद्ध प्रतिमा :** निसर्गातील घटकांचा मानवी व्यवहारांशी अनुबंध जोडत कल्पित अनुभवांची निर्मिती करताना निगर्सघटितांशी केलेले तादात्मीकरण कवितेत निसर्गसंबद्ध प्रतिमासृष्टी निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. वेली, फुले, झाडे, पाने, पक्षी, नदी, पाणी, ऊन, वारा, पाऊस, गवत आदी निसर्गघटितांशी साधलेली एकरूपता निसर्गसंबद्धता दर्शविते. उदाहरणार्थ, हाकेचे बर्फगार धुके झालेले आदिम वासनांचे झगझगीत ऊन, सांजेचा अमित्र चेहरा, दुःखाचा सावरकापूस पसरणे, चंद्र इच्छेवर झळझळणे, दवाच्या

डोळ्यांची पोर, जीवाला सलणारी तुसं काढणं, मातीखालची गडदभूल ओलच होणे, फुलांच्या हृदयात झोपलेला सुगंधी मृत्यू होणे, काळजीची वेल खुडणीला येणे, जीवांच्या फुलांचे बहर, मृगजळात मंद स्मरणाच्या वाफा उठणे, मनाचे काळे रेशीम, वणव्याच्या लपलपत्या रेषेइतके दाहक अटळ अंतर (दोहोंतील), समजुतीवर पुरेपणाचा चंद्र उगवणे, हिरव्या संवेदनांची रसरशीत गवती कुरणं, आस्थेची हिरवी पाने असणे, स्वराला पारंब्या फुटणे, सोनपिवळी बाभूळ, सांजेचे कोवळे कोमल हात, भुरभुरत्या किरणांचा गुच्छ, संस्कृतीचे घनगर्द अरण्य, जगण्याच्या मुळाशी थेंब थेंब गोडवा साठणे, पावसाच्या हाती ऊनओला हात देणे, पाऊस नेसणे, सांज चोळामोळा होणे, जुईच्या वासाचे हात गळ्यात पडणे, हिरवे स्वप्न हातात येणे आदी प्रतिमांतून निसर्गघटितांची मानवी व्यवहाराशी सांगड घालून काव्यार्थ घडविण्यात आलेला आहे.

**आत्मनिष्ठ जाणिवांतून उद्भवलेल्या प्रतिमा:** आत्मनिष्ठ जाणिवांची अभिव्यक्तीविशिष्टता ढेरेंच्या कवितांतून प्रकर्षाने प्रत्ययाला येते. स्वसंवाद व स्वेतर विश्वातील घटकांशी साधलेला भावानुबंध आत्मनिष्ठेच्या अनुभूती असलेल्या प्रतिमांची निर्मिती होण्यास कारक ठरतो. उदाहरणार्थ, सुवासाने भरलेले अज्ञाताचे काळे कुतूहल हुंगणे, नव्या अनुभवावरून मनाचा पदर घट्ट लपेटून घेणे, समजुतीवर काळीज टेकणे, भय उकळणे, स्वतःच्याच भाळावर उमटलेली हरणांची भित्री जन्मलिपी चाचपणे, आतल्या सुखाचा श्वास कमी होणे, उमेद मोडून पडणे, पक्वतेचा आवेग सहन न होणे, शांत निबोलका विश्वास, संभ्रमावर चिमुकले विस्मरण पसरणे, गळणाऱ्या उदासीचा टपटप मग्न आवाज, इच्छांचा दरवळ घमघमणे, निरंजन मन, तुटलेल्या, संवादाचे ओझे वागविणे, मनापाशी लहानसे हिरवेगार प्रेम कोंबावणे, सुखाच्या ऋतूंचे गंध, सुख सुखावणे, हातातला क्षण फुटणे, दयाबुध्दीची कूस फळाला येणे, उमेदीचे जुने दिवस डोळ्यांत उजळणे, रक्तातून निळीकाळी खंत विरघळणे, वंचनेचे विष पिणे, मनाचे काळे रेशीम, समजुतीवर पुरेपणाचा चंद्र उगवणे आदी प्रतिमांतून आत्मशोध, क्लेश, आनंद आदी मानवी भावभावनांची सूचक अभिव्यक्ती व अर्थसौंदर्य प्रकट करण्यात आलेले आहे.

**स्त्रीत्वाचे दर्शन घडविणाऱ्या प्रतिमा:** मानवी जीवनव्यवहाराकडे तटस्थ व प्रगल्भ वृत्तीने पाहिल्यामुळे ढेरेंच्या कवितांच्या आशय अभिव्यक्तीला वैचारिकतेचे परिणाम प्राप्त झालेले आहे. ही वैचारिकता पुरुषाचा द्वेष करीत विद्रोह अथवा टोकाच्या विरोधी भूमिकेतून प्रकट होत नाही. स्त्री-पुरुष नात्यांतील तणावाचे परीक्षण, दुःखाची कारणमीमांसा करीत सूक्ष्मातिसूक्ष्म भावसंवेदनांच्या अभिव्यक्तीतून स्त्रीत्वाचे दर्शन घडविण्यात येते. पुराण कथांतील सीता, रूक्मिणी, राधा, उर्मिला, जनाबाई यांच्या दुःखाशी तादात्मीकरण करून घेत समकाळातील स्त्रीच्या व्यथांची साम्यभेदाच्या पातळीवरील सांगड पुराणकाळ ते समकाळातील स्त्रीत्वाच्या घडणीतील घात-आघातांचे, शोषणाचे अनेक संदर्भ अर्थाचे

संसूचन प्रतिकात्मकरित्या करून जातात. त्याचप्रमाणे लौकिक जीवनातील स्त्रीत्वाच्या घडणीचे संदर्भ वैशिष्टपूर्णरित्या येतात. उदाहरणार्थ, परस्परांतील नात्याचा प्राण उडणे, कापराची ज्योत होऊ दिलासे तेवणे, एकांताचा दुखरा वास, नवेल्या पोरीचे शरीर चुरले जाणे, कासाराला हात देणे, सुखाची किनकिन ऐकणे, आयुष्याला हात देणे, थेंबभर स्नेहात भिजून तेवणारे दिलासे, हातून निसटून खळकन फुटलेले पोरपण, जगण्यात झिरपणारे सांत्वन, आत्मवैभवी दुःखाची दृष्ट उतरवणे, युगांचे मातृवन, ठाम निष्ठेच्या विप्रश्न सुगडाचे वाण, दुर्मिळ हसू पदरात बांधणे, पदर बांधून जगण्यात स्वतःला झोकून देणे, शपथांचे, वचनांचे अर्थ भिजणे, बायकांचे धुण्यागत चुबकून निघणे, आयुष्य चोखून खाण्याची हौस, आपलेपणाची लहानशी कृष्णकरंगळी टेकणे, एकमेकांचे झणझणीतप न सोसणे, उमेदीच्या उत्फुल्ल दिवसांचे सडे, निरागस गोष्टींसाठी मुका शोक करणे, जगण्याचे कोवळे संदर्भ वाहून जाणे, ओळखीचा पदर शोधणे, एका बाळक्षणापाशी दिवा उजळणे, फुललेले बोलणे अर्ध्यावर खुडणे, पाचोळ्याने पदर भरून जाणे, गळून गेलेल्या हेतूंना तीव्र तहान लागणे. मनाच्या तावदानावरून एकटेपणा संथपणे गळत राहणे, स्वतःच्या कौतुकाने डवरणे आदी प्रतिमांच्या योजनेतून स्त्रित्वाचे व्यापक दर्शन घडविण्यात आलेले आहे.

**वेदनांकित जाणिवांचे दिग्दर्शन करणाऱ्या प्रतिमा**: कष्ट व वेदनांनी स्त्रीजीवनाला पुरुषाच्या जीवनाहून भिन्न बनविले. ही भिन्नता नियत होण्यासाठी स्त्रीची भावनिक व मानसिक ठेवणही जशी कारणीभूत आहे तशीच तिच्या कुचंबणेला व शोषणाला कारणीभूत ठरणाऱ्या समाज, रूढी व परंपरा या घटकांनाही तितकेच जबाबदार धरावे लागेल. विशिष्ट परिस्थितीत एकाकी पडलेली स्त्री दुःखी, हतबल होते, पुन्हा सावरते. आपल्या दुःखाची कारणमीमांसा करून त्याकडे प्रगल्भतेने पाहते. अनेकदा मनाच्या पातळीवरील घुसमट,वेदना सहन करणे कठीण झाल्यानंतरचा आवेग व्यक्त करणाऱ्या प्रतिमाही सहजपणे साकारल्या जातात. उदाहरणार्थ, जगण्याचे असमंजस भणाण वारे अंगावर घेणे, अंधाराचा भक्कम जाड दोर हाती लागणे, नात्यांच्या हृदयातली विराट हुंदक्यांची लुकलुक, काळाची अखंड वेदना, आत्म्याच्या चिंध्या होणे, दुःखाचे गडद काळसर धुके, नात्याचा प्राण उडणे, मनाचा पदर घट्ट लपेटून घेणे, लुटारू आयुष्य, चिरंजीव दुःख, प्रेम नावाची जिवलग जखम दुःखाचा सावरकापूस पसरणे, दुःखाच्या थारोळ्यात तडफडणे, अंधाराचा कल्लोळ छिनूण टाकणे, देह–मनावरील जुन्या खुणांचे सांत्वन शोधणे, नकाराची लकेर असलेले होकार देणे, कुस्करलेली क्षीण स्वप्न, आयुष्य दुःखाने उतू जाणे, जन्मांचे मुकाट शकून धरून ठेवणे, तप्त तडफडीने सांडणे, दुःखाचे श्वापद मनालगत गुरगुरणे, विश्वासावर अधांतरी दुखरी स्वप्ने टेकविणे, दुःखाचे सोहळे, उदास-व्याकूळ ओढ लागणे, दीर्घ गडद उदासी, सोसण्याचा अर्थ ओंजळीत येणे, दुःखावर निथळणारे श्वास, रक्तात दबा धरून असलेले हताश भय, एकटेपणाच्या यातनांचे नख लागणे, रक्तात हताश कैफ विरघळणे, एकटेपणाचे

नख गळ्याला लागणे, रोगट संधिप्रकाश सुन्नपणे गळणे, झाडोऱ्यात दबा धरून बसलेले काळेशार एकाकीपण, अपरिचित उदासी खोल प्राणांत जागणे आदी प्रतिमांतून स्त्रीच्या वेदनांकित जाणिवांचे दिग्दर्शन करण्यात आलेले आहे.

**रोमँटिक जाणिवांचे चित्रण करणाऱ्या प्रतिमा** : या कवितांतून रोमँटिक जाणिवांचे वैविध्यपूर्ण आविष्करण करण्यात आलेले आहे. स्त्री-पुरुष प्रेमाच्या आदिम भावनावेगापासून समकाळातील संयत भावनाशीलतेचा प्रत्यय येतो. अशी बहुविध स्थित्यंतरे दाखविणाऱ्या प्रेमानुभवाची विभिन्नता अनुभवला येते. प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी, देव व भक्त यांच्यातील प्रेमातून निर्माण होणारी भावनिक आंदोलने, संघर्ष व वैचारिकता रोमँटिक जाणिवांचे चित्रण करणाऱ्या प्रतिमांतून अभिव्यक्त करण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ, गरम इच्छांसारखे पिवळेजर्द गवत, स्नायूंचे जोरकस वादळी उठाव, सुखाचा स्पर्श प्राणांपर्यंत उतरणे, चंद्र इच्छेवर झुळझुळणे, टपोर नजरेवर उतरलेले आभाळ जरतारी आनंदावर सावरून धरणे, ऐहिक अपेक्षांची भरजरी तिरीप काळजावरून संथ सरकून जाणे, त्वचेतून निरभ्र देहस्वी फुटणे, जीव केशराचे फूल होणे, रासवट स्पर्शाच्या उंच गवताच्या हिरव्या धारदार इच्छा, मधाचे जहर होणे, अर्ध्या कळ्यांची कोवळी जाग होणे, खुणेचे गीत होणे, तृप्तीलाच नवी तहान लागणे, एकांतावर केसाळ वजनदार पावले वाजणे, स्पर्शातून विश्वासाचे मंद सळसळणे, आतल्या गोड निळ्या तंद्रीत गुरफटून जाणे, ओढाळ सुख, इच्छांच्या खळग्यात साचलेले स्वप्नांचे चमचमते पाणी, देहाला तोरण, श्वासांची शिंपण करणे, चांदण्यांची घडी अंगभर लपेटणे, जिवलगाच्या सुखाने रसाळ होणे, निरीनिरीतून भुरूभुरू अंधार गळणे, चंद्र जिवलग समजुतीने झरणे, डोळ्यांत खिदळणारे ऊन, उन्हाचे जरी पदर झळझळणे, ओटीत चंद्र झळझळून येणे, आदी प्रतिमांतून प्रेमभावाचा उत्कट प्रत्यय येतो.

**'मी'च्या अलौकिक जीवनानुभूतीचे रम्य दर्शन घडविणाऱ्या प्रतिमा**: 'मी'च्या विविध रूपांतील योजनांचा सविस्तर आढावा आपण या लेखनाच्या पूर्वार्धात घेतलेला आहे. अरुणा ढेरेंच्या कवितांतून 'मी'ची योजना अलौकिक जीवनानुभूतींचा प्रत्यय देणारी असल्याचा अनुभव येतो. संत जनाबाई, विठ्ठल, रूक्मिणी, सीता, राधा, उर्मिला यांच्याविषयी असलेल्या आस्थामय कुतूहलाचा काव्यव्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडलेला आहे. या प्रतिमांच्या निर्मितीमागे सश्रध्द मन आहे. उदाहरणार्थ, श्रध्देवर जन्म तोलून धरणे, सावल्यांचे निर्गुण आत्मे वितळवणे, स्तब्धपणाला छेद न जाणे, दृष्टीच्याही पैल सुगंध होणे, निद्रेच्या स्वप्नातील उजेड होणे, मृण्मय वेदनेच्या कळशीतील ब्रम्हजळ होणे, निरंजन मन, बाईपण विठूनामाशी तोलणे, प्राणांचा दिवा लावून संस्कृतीचा अंधार उजळणे, कवितांची मंत्राक्षरे होणे, आसक्तीचा नितळ उच्चार, निळ्या दुःखाने काठोकाठ भरून जाणे, संस्कृतीच्या एकांतात करूणेचा चंद्र उगवणे, करूणेचा दीप शब्दांत लागणे आदी प्रतिमांतून कवितेतील 'मी'च्या अलौकिक जीवनानुभूतींचे रम्य दर्शन घडते.

**शब्दनिष्ठ प्रतिमा**: 'शब्द' हे कवितेसाठी वरदानच होय. अरुणा ढेरेंनी शब्दांविषयी मराठी कवितेच्या परंपरेत नव्या जाणिवांची मूल्यात्मक भर घातलेली आहे. 'मंत्राक्षर' या काव्यसंग्रहात 'कविता शब्दांच्या' हा एक विभागच आहे. शब्दांना स्वतंत्र व्यक्तित्व असल्याचे कल्पित घटित असो किंवा शब्दांचे मंत्राक्षरातील दिव्य रूप असो, अशा अनेकविध शक्यतांना अभिव्यक्त करण्यासाठी शब्दनिष्ठ प्रतिमांची योजना करण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ, शब्दांची रिकामी टोपली, शब्दांत कोमल काळोख उतरणे, अनोळखी शब्दांची दिवेलागण लखलखत राहणे, काळजापाशी पसरवणारा शब्द होणे, शब्दांची चिमुट दुःखांवर टेकवणे, कोवळे मोड आलेले शब्द, भाषेच्या नितळ त्वेचवर मत्सराचे, क्षुद्रपणाचे काळेनिळे ठसे उमटत राहणे, शब्दाच्या माथ्यावर निळेभोर आभाळ पसरून देणे, शब्दाला हिरवी भूल पडणे, रक्तमांसातून शब्द उगवणे, आसक्तीचे आभाळ शब्दांवर झुलवत ठेवणे, भाषेतून शब्दाचा स्नेह वाहणे, आदी शब्दनिष्ठ प्रतिमांतून नवा संवेदनानुभव प्रत्ययाला येतो.

**प्रतीके**: अरुणा ढेरेंच्या कवितांतील प्रतीकांची योजना वैशिष्ट्यपूर्ण आहे. या प्रतीकांना स्थळ, काळ, व्यक्ती, घटितसापेक्ष संदर्भ आहेत. स्त्रीत्वाचे टोकदार भान व्यक्त करण्यासाठी दुःखाचे श्वापद यासारखे अभिनव प्रतीक योजण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे वास्तवाचा अचूक वेध घेणारी भौतिक व अधिभौतिक घटितांचा व्यापक अर्थ सूचित करणारी अनेक प्रतीके योजण्यात आलेली आहेत. उदाहरणार्थ, नदी, पाऊस, अंधार, माती, बीज, पोखरलेले झाड, काळा वारा, चंद्र, रात्र, दिवस, दुपार, ऊन, अंगण, काळ, विष, दुष्काळ, कळ्या, फुले, पशु, पक्षी, वादळ, शब्द, राक्षस, वाडा, उजेड, अहंभाव, मांडीवरील तीळ, मुसळ, स्त्रित्व, पदर, स्वप्न, युध्द, आत्मा, जन्म, मृत्यू, कातरवेळ, स्वातंत्र्य, मोर, निरंजन, तुळस, धुके, धूर, ओटी, नदी, गवत, खडक, नाग, सूर्य, हास्य, गीत, आदी प्रतीके वेधक आहेत.

प्रस्तुत लेखात अरुणा ढेरे यांच्या निवडक चार कवितासंग्रहांतील कवितांच्या संहिता आधाराला घेण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या कवितांतील काव्यसौंदर्य उलगडताना आशय व रूप यांच्यातील एकात्मता वेधक असल्याचा प्रत्यय येतो. कवयित्रीला आशयाबरोबरच रूपबंधाविषयीचे डोळस भान असल्याने कवितांतून नवी काव्यभाषा घडविण्यात आली आहे. त्यामुळे नव्या प्रतिमा-प्रतीकांची योजना स्वाभाविकपणे करण्यात आलेली आहे. भारतीय स्त्रीत्वाचा व्यापक व संतुलित आवाज या कवितांतून घुमत राहतो. हे संचित नव्या पिढीसाठी मौलिक ठेवा आहे. **(समाप्त)**

**(डॉ. अरुण ठोके, ०६, जे. पी. रो-हाऊस, ओकारेश्वरनगर, ,
अमृतधाम पंचवटी, नाशिक ४२२००३. भ्रमणध्वनी क्र. ९१७५१६४७९९)**